दैनिक जागृत

RNI NO.: MAHMAR/2010/40070

# जनप्रवास

धाराशिव

•रविवार |१५/९/२०२४

•पाने ६ | किंमत ४ रू. | वर्ष १३ अंक ३८७

email:jagrutjanpravas@gmail.com

संपादक-धनंजय दिनकरराव पाटील,मो.नं.9404380811

Jagrut Janpravas

**पाहिजेत**

धाराशिव शहरामध्ये नामांकित क्लिनिक मधे काम करण्यासाठी

1) ANM स्टाफ सिस्टर/ब्रदर पाहिजे

2)कंप्यूटर चे ज्ञान असलेली रिसेप्शनिस्ट पाहिजे

संपर्क-९८२२०९९११०

## धाराशिव नगरीत मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली

# शिवसेना पक्ष कार्यकर्ता मेळावा संपन्न

**धाराशिव**–महाराष्ट्राच्या कुलस्वामिनीच्या पावन भूमीतून मुख्यमंत्र्यांनी विधानसभेच्या निवडणुकीचे बिगूल शिवसेना पक्ष कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात फुंकले. या शिवसेना पक्ष मेळाव्यासाठी मुख्य मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले शिवसेना पक्षाचे प्रमुख तथा महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे स्वागत शिवसेना जिल्हा संघटक सुधीर पाटील यांच्याकडून करण्यात आले.

प्रथम हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज व शिवसेना प्रमुख हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आमदार ज्ञानराज चौगुले, सुरज सांळुखे, अनिल खोचरे, आनंद पाटील, अमर कदम परमेश्वर आणि इतर शिवसेना नेते व



पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्यमंत्री लाडकी बहिणीच्या लाभार्थी असलेल्या बहिणीकडून व सौ. प्रेमाताई सुधीर पाटील,सौ. सुषमा देशमुख,सौ. डॉ.मंजुळा आदित्य पाटील यांनी मुख्यमंत्र्यांचे औक्षण केले. यावेळी १९० शिवसेना शाखेच्या फलकांचे अनावरण व शेकडो युवकांचा शिवसेना पक्ष प्रवेश मुख्यमंत्र्यांचे उपस्थितीत झाला.

मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिक भास्करराव सां. नायगांवकार, बुबा साहेब उर्फ यशवंत माधवराव जाधव,शेषराज बनसोडे, गोविंद नलावडे यांचा सत्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. धाराशिव जिल्हा शिवसेना संघटक सुधीर पाटील यांच्या नेतृत्वाखाली या मेळाव्याचे आयोजन हातलाई मंगल कार्यालय धाराशिव येथे करण्यात आले होते. या मेळाव्यात शिवसेनेच्या पदाधिकारी व शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्र शासनाच्या अनेक लोककल्याणकारी योजना सरकार सामान्यांसाठी, गरिबांसाठी राबवत असून लोकांना यांचा लाभ मिळत असून जास्तीत जास्त संख्येने या योजनांचा लाभ घेण्याचे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. या योजना लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम शिवसैनिकांनी योजना दूत म्हणून करावे असे आवाहन त्यांनी केले.

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेमुळे लाखो बहिणीच्या खात्यावर रक्कम आज प्रत्येक महिन्याला पडत आहे . त्यामुळे विरोधकांचे पोटशूळ उठत असल्याचे त्यांनी सांगितले. या मेळाव्यास जिल्हाभरातून हजारो शिवसैनिक व मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेच्या लाभार्थी महिला व युवानेते अभिराम पाटील, निखील कांदेपाटील तसेच जिल्हातील पदाधिकारी तमाम शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते सुत्रसंचालन संदीप जगताप यांनी केले तर आभार आदित्य सुधीर पाटील मानले.

## प्रखर बीम लाईट व लेझर बीम लाईटबाबत पोलिसांनी काढले प्रतिबंधक आदेश

**महेश गायकवाड**

**सोलापूर**–प्रखर बीम लाईट व लेझर बीम लाईटबाबत पोलिसांनी विशेष आदेश काढले असून असे प्रखर लाईट आणि लेझर बिम लाईट लावण्यासाठी मनाई केली असून प्रतिबंधक आदेश काढले आहेत.

प्रखर बीम लाईट व लेझर बीम लाईट बाबत भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधक आदेश विशेष शाखा सोलापूर पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या स्वाक्षरीने काढण्यात आले आहे.

ज्याअर्थी दि.०७/०९/२०२४ ते दि. १७/०९/२०२४ या कालावधीत सार्वजनीक गणेशोत्सव साजरा होत आहे. शिवाय दि.१९/०९/२०२४ रोजी मं. पैंगबर जयंती देखील साजरी होत आहे. सोलापूर शहरामध्ये तीन दिवस, पाच दिवस, सात दिवस, नऊ दिवस व अनंत चतुर्दशी दरम्यान गणेश मुर्तीचे विसर्जन होते. अनेक सार्वजनिक मंडळे ही आपल्या मंडळांच्या गणेश मुर्तीचे विसर्जन हे मिरवणूकीने करतात. मिरवणूक प्रसंगी विविध गणेश मंडळे साऊंड सिस्टीम सोबत प्लाझमा, बीम लाईट आणि लेझर लाईटचा मोठ्या प्रमाणावर वापर करत असल्याचे निर्दर्शनास आले आहे.

माझी अशी खात्री झाली आहे की, सदर



प्लाझमा, बीम लाईट आणि लेझर बीम लाईटचे प्रखर प्रकाशामुळे रस्त्यावरुन जाणारे वाहन चालकांचे डोळे दीपून चालकांचे वाहनांवरील नियंत्रण सुटून सदरचे वाहन मिरवणूकीमध्ये जाऊन मोठी दुर्घटना घडू शकते. तसेच प्लाझमा, बीम लाईट आणि लेझर बीम लाईटचे प्रखर प्रकाशामुळे गणेश विसर्जन मिरवणूकीमध्ये सामील झालेले मंडळांचे सदस्य व मिरवणूक पाहण्यासाठी आलेली लहान मुले, वयोवृध्द इसम, जेष्ठ नागरीक, सामान्य नागरीक यांचे डोळयास इजा होऊन, डोळा कायमचा निकामी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सोलापूर शहरात गणेश विसर्जन मिरवणूकीमध्ये प्लाझमा, बीम लाईट आणि लेझर बीम लाईटचे वापरावर निबंध घालणे आवश्यक आहे. तरी दि. १५/०९/२०२४ रोजीचे सकाळी ०९.०० वा. पासून ते दि. १९/०९/२०२४ रोजीचे २४.०० वा. पर्यंत सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये प्लाझमा, बीम लाईट आणि लेझर बीम लाईटचा वापर करु नये. याकरिता भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे बंदी घालणे आवश्यक असल्याची बाब माझ्या निदर्शनास आली आहे. त्याअर्थी मी एम. राज कुमार, पोलीस आयुक्त सोलापूर शहर मला असलेल्या अधिकारान्वये सोलापूर शहरामध्ये दि. १५/०९/२०२४ रोजीचे सकाळी ०९.०० वा. पासून ते दि.१९/०९/२०२४ रोजीचे २४.०० वा. पर्यतच्या कालावधीसाठी गणेश विसर्जन/ ईद-ए-मिलादुन्नबी गिरवणूकीत/ सार्वजनिक कार्यक्रमात कोणत्याही व्यक्ती किंवा गणेश मंडळ किंवा कार्यक्रम आयोजक यांनी प्लाझमा, बीम लाईट आणि लेझर बीन लाईट वापरात/उपयोगात आणू नये यासाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंध करण्यात येत आहे.सदर आदेशाचे उपरिणामी व्यक्ती भारतीय न्याय संहित्ता कलम २२३ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील सदरचा आदेश दि.१४/०९/२०२४ रोजी हा एम. राजकुमार यांच्या सही ने काढण्यात आला आहे.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा पूर्वतयारीचा निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी घेतला आढावा

**सोलापूर**–मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा वचनपूर्ती सोहळा कार्यक्रम माहे सप्टेंबर २०२४ मध्ये नियोजित आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणांना जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी प्रत्येक शासकीय यंत्रणेने हा सोहळा यशस्वी होण्यासाठी केलेल्या पूर्वतयारीचा आढावा घेऊन मार्गदर्शक सूचना दिल्या.

नियोजन भवन येथे आयोजित मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत पूर्वतयारी आढावा बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी कुंभार बोलत होत्या. उपजिल्हाधिकारी तथा भूसंपादन अधिकारी संतोष देशमुख, जिल्हा कार्यक्रमाधिकारी प्रसाद मिरकले, सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदिप कारंजे, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, विशेष व गुन्हे पोलीस उपआयुक्त श्रीमती दिपाली काळे, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास गुजरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एम.आर.ठाकरे, तहसिलदार श्रीकांत पाटील यांच्यासह



अन्य सर्व संबंधित विभागाचे प्रमुख उपस्थित होते. तसेच सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार ऑनलाईन द्वारे बैठकीत सहभागी झालेले होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी कुंभार यांनी बैठकीत बांधकाम विभागाकडून कार्यक्रम स्थळावर करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती जाणून घेतली. तसेच पार्कींग, वीज पाणी, साफसफाई याबाबतची महापालिकेकडून माहिती घेतली व आवश्यक सूचना दिल्या. सर्व विभागांनी सोपविलेली कामे वेळेत पूर्ण करावीत. कार्यक्रम स्थळी शासकीय विभागांनी समन्वय ठेवून नियोजनबध्द काम करावे.

पोलीस विभागाने कार्यक्रमाच्या दिवशी वाहतूक व्यवस्थेचे नियोजन काटेकोरपणे करावे. वाहतुकीस कोठेही अडथळा निर्माण होणार नाही या अनुषंगाने पार्किंगची व्यवस्था ठेवावी. एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी महिला लाभार्थी घेऊन येणे व मेळावा झाल्यानंतर त्यांच्या ठिकाणी सोडणे यासाठी आवश्यक असलेल्या बसेसची पूर्तता करावी. पुरवठा विभागाने लाभार्थ्यांसाठी जेवणाची उत्कृष्ट व्यवस्था करण्याबरोबरच त्यांना कोणतीही अडचण येणार नाही याची ही दक्षता घ्यावी, असे त्यांनी सुचित केले.

## गवळी गल्लीतील गणेश मंडळांनी बालिका जन्मोत्सव जल्लोषात साजरा

**धाराशिव**–गवळी गल्लीतील श्री बाल हनुमान गणेश मंडळ धाराशिवचा महाराजा मानाचा गणपती गणल्या गेलेल्या मंडळातर्फे शासकीय महिला रुग्णालयांमध्ये बालिका जन्मोत्सव जल्लोषात साजरा मातांच्या व स्त्री बाळांच्या सन्मानने,स्त्री भ्रूण हत्या रोखा, मुली वाचवा मुली शिकवा, या जय घोषात साजरा केला गेला. गणेशोत्सवातील लक्ष्मी आल्यापासून ते लक्ष्मी जाईपर्यंत या तीन दिवसाच्या कालावधीत शासकीय रुग्णालयांमध्ये ज्या मातांना पूर्वी मुली होत्या व आज मुलगी झाली आहे. अशा सर्व मातांनी स्त्रीत्वाचे बाळ स्वीकारले बाळांचा सन्मान, डॉक्टर पाटील मेट्रन्स महादेवी लोहार, डॉ. राजेश भिसे,गोस्वामी, सिस्टर इतर त्यांचे सर्व सहकारी यांच्या उपस्थितीत चित्रलेखा दिवटे, सुरेखा हुचे, सौ नम्रता, सौ. साखरे सौ खांडेकर जोत्सना व कीर्ति दिवटे इतर महिला मंडळाच्या वतीने या मातांच्या व मुलींचा सन्मान करताना डॉ. पाटील म्हणाल्या मंडळाचे कार्य६० वर्ष अखंडपणे चालणे, बालविवाह रोखणे, बालनाटिका सादर करणे व मुलींचा स्वीकार केलेल्या मातांचा बाळाचा सर्वांचा सन्मान हाच समाज व देशाचा सन्मान, हिंदवी स्वराज्याचा निर्माता जिजाऊ माता यांचा आदर्श स्त्रियांचा सन्मान याचमुळे भारत देशात संस्कृती,संस्कार निर्माण झाले व वाढले. तेरा मुली व मातांचा सन्मान बाळासह अंगडे ,टोपडे स्टील चमचा, स्टील वाटी,फुलपात्र व झंपर पीस मंडळाच्या श्री ची प्रतिमा व मंडळाचा शेला देऊन सन्मान करण्यात आला. सौ. वृंदावनी या मातेने सर्वांच्या वतीने आपले मत व्यक्त करताना आम्हाला दुःख नाही. आनंद आहे. मुलगा मुलगी असा भेद मानत नाही .आज सर्वात जास्त मुली शिक्षण घेऊन उच्च पदावर कार्यरत आहेत .मुलगा हवा असे ज्या मातेला वाटत असते, त्यांचा उदासपणा घालवण्याचे कार्य मंडळांनी केले. धाराशिव शहरांमध्ये विविध प्रकारच्या



महिलांच्या जनजागृतीसाठी ,सक्षमीकरणासाठी विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान करणारे मंडळ आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीतासाठी काशिनाथ दिवटे, डॉ.अजित नायगावकर,मनमत पाळणे, प्रा. गजानन गवळी मनोज अंजिखाणे, विद्या साखरे, युवराज हुचे,अतुल ढोकर दुर्गेश दिवटे बसवेश्वर पाळणे, एडवोकेट अमोल दिवटे मुझे मिल पठाण इत्यादी परिश्रम घेतले. प्रा भालचंद्र हुचे यांनी प्रास्ताविक व संचलन केले. डॉ.नायगावकर यांनी आभार मानले.

स्त्रीभ्रूणहत्या रोखा, जिच्या हाती पाळण्याची दोरी तीच जगाशी उद्धारी असा संदेश मंडळाच्या वतीने व आंतरराष्ट्रीय भरडधान्य पौष्टिक आहे विविध प्रकारच्या घोषवाक्याचे पॉम्पलेट दवाखान्यातील नातेवाईक व माता भगिनी रुग्णांना वाटप महिलासक्षमीकरण,सबली करण,स्वसंरक्षणार्थ लाठी काठी मोफत प्रशिक्षण सुरू केले, महिलातील विविध सूक्त कलागुणाला विकसित करण्यासाठी गौरी गणपती या उत्सवाच्या दरम्यान विविध कला सादर करून महिलांनी एक आगळावेगळा ठसा या कार्यक्रमातून समाज प्रबोधन महिलांच्या कर्तुत्वाला संधी या रंगमंचकांनी उपलब्ध करून दिली आहे डॉक्टर पाटील मॅडम यांनी मला दोन मुली आहेत माझे पती डॉक्टर आहेत मी एक मुलगी झाल्यानंतर गर्भ राहिला त्यावेळेस मी अनेक तपासण्या करून मुलाचा गर्भ नसेल तर त्या मी डावले असते पण तपासणी केली नाही व कुठल्याही प्रकारच्या मनामध्ये शंका येऊ दिली नाही.गोस्वामी मॅडम यांनी कविता सादर करून मला दोन मुले आहेत मुलगी नाही हे दुःख सांगून महिलांची मानसिकतेला बळ दिले यांच्या मनोगताने समारोप झाला.

## शमी विघ्नेश गणेश मंदिरात मुख्याधिकारी रमाकांत डाके यांच्या हस्ते गणेशाचे पुजन

**अक्कलकोट**–श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या श्री शमी विघ्नेश गणेश मंदिरात रोजी सायंकाळी अक्कलकोट नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

सालाबादाप्रमाणे यंदाही श्रींचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येत आहे. सदरील पुजा ही सोमवार दि. १६ सप्टेंबर पर्यंत आयोजित करण्यात आली असून, शमीवृक्षाखाली गेल्या ३४ वर्षा पूर्वी श्री गणेशाची स्थापना करून सुंदर असे मंदिर बांधण्यात आले आहे. श्री स्वामी समर्थांच्या पावन भूमीवर श्री शमी विघ्नेश गणेश मंदिर असल्याने



त्याचे स्थान व महात्म्य अलौकिक आहे.

याप्रसंगी अक्कलकोट नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांचा न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. विविध धार्मिक विधिवत पूजा न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी व संजय कुलकर्णी यांच्याकडून करण्यात आली.

यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, विश्वस्त लक्ष्मण पाटील, संतोष भोसले, आप्पा हंचाटे, प्रविण घाटगे, नामा भोसले, कुमार सलबत्ते, दत्ता माने, राजू पवार, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, सुमित कल्याणी, सतीश महिंद्रकर, किरण साठे, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# संपादकीय...

## अर्थव्यवस्थेतील अग्निवीर

भारतातील बेरोजगारीचे प्रमुख कारण म्हणजे, कौशल्याचा अभाव असे भारत सरकारकडून सांगितले जात आहे व त्यासाठी शिक्षण व्यवस्थेला जबाबदार धरण्यात येत आहे! कौशल्य प्राप्त झाले की, रोजगार आपोआप मिळेल, असे एक सोपे गणित शासनाकडून मांडण्यात येत आहे. लष्करातील अग्निवीर योजना याच गृहितकावर आधारलेली आहे. अग्निवीरांना चार वर्षांचे प्रशिक्षण मिळाले की, नंतर सुरक्षारक्षक म्हणून किंवा इतर काही त्यांना नोकरी मिळेल, अशीच सरकारची भूमिका आहे.
राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा २०२४चा अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी जुलै महिन्यात लोकसभेला सादर केला आहे. हा अर्थसंकल्प युवक, रोजगार, कौशल्य विकास हे मुद्दे केंद्रस्थानी ठेवून तयार करण्यात आला आहे, असे केंद्र सरकारच्या वतीने सांगितले जात आहे व यासाठी रु. दोन लाख कोटींची भरघोस तरतूद पाच वर्षांसाठी करण्यात आली आहे, अशीही पुष्टी जोडण्यात येत आहे.
भारतात रोजगार व बेरोजगारी याची वस्तुस्थिती काय आहे याबद्दल सरकारी संस्था व स्वायत्त संशोधन संस्था यांच्या आकडेवारीत फरक दिसून येतो. भारतीय मध्यवर्ती बँकेचा 'पीरियॉडिक लेबर फोर्स सर्व्हे'चा निष्कर्ष असा आहे की, भारतात बेरोजगारी ३.२ टक्क्यांनी कमी झाली आहे, तर स्टेट बँकेचा अहवाल असे म्हणतो की, २०२३–२४ या वर्षात १२५ दशलक्ष नोकऱ्या भारतात निर्माण झाल्या आहेत. या दोन्ही संस्था केंद्र सरकारच्या आहेत.
पण सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकोनॉमी (सी.एम.आय.ई.) ही स्वायत्त व विश्वासार्ह संस्था म्हणते की, भारतात बेरोजगारीचा दर ९ टक्के, तर आंतरराष्ट्रीय श्रम संघटना (आय.एल.ओ.) च्या इंडियन लेबर फोर्स अहवालात त्यांचे निरीक्षण असे आहे की, भारतात ८३ टक्के तरुण बेरोजगार आहेत (मार्च २०२४) सरकारी संस्थांपेक्षा या स्वायत्त संस्थांचे अहवाल जास्त विश्वासार्ह आहेत. कारण भारतातील वास्तव व अहवालांचे निष्कर्ष जुळून येतात.
उदा. मे २०२४ मध्ये महाराष्ट्र पोलीस दलात भरती होती, त्यात १७,४७१ जागा होत्या व १७ लाख ७६ हजार अर्ज आले होते. या पदांसाठी किमान पात्रता बारावी पास होती; पण ४१ टक्के अर्जदार उच्चशिक्षित होते. उदा. एम.बीए., एलएल.बी., बी.टेक अर्हता प्राप्त आहेत. या भरतीत एका पदासाठी १०१ अर्जदार आहेत, असे दिसून येते. महिला पोलीस भरतीसाठी ३९२४ पदांसाठी पावणेतीन लाखांहून अधिक अर्जदार होते, म्हणजे एका पदासाठी सुमारे ७० अर्जदार! हे कशाचे द्योतक आहे?
सन २०२४च्या अर्थसंकल्पात रोजगार वाढवण्यासाठी 'एम्प्लॉयमेंट इंटेंसिव्ह' योजना अंमलात आणण्याचे अर्थमंत्र्यांनी जाहीर केले आहे. त्यांच्या तीन योजना अर्थमंत्र्यांनी जाहीर केल्या आहेत. एक, पहिल्यांदा नोकरीला लागलेल्या तरुणांसाठी. दोन, उत्पादन क्षेत्रात रोजगार निर्मितीला चालना देण्याची योजना व तीन, कंपनी मालकांसाठी प्रोत्साहनपर योजना! या सर्व योजनांत एक समान सूत्र आहे की, तरुणांना रोजगार देणाऱ्या कंपन्यांना काही आर्थिक लाभ/प्रोत्साहन दिले जाईल! सरकारच्या अंदाजाप्रमाणे पहिला योजनेतून २.१ कोटी तरुणांना फायदा होईल. दुसऱ्या योजनेतून ५० लाख रोजगार मिळेल, असे केंद्र सरकारला वाटते! याचबरोबर केंद्र सरकारने इंटर्नशिपची योजना पण जाहीर केली आहे.
केंद्र सरकारच्या योजनांचा दिखाऊ फायदा काही तरुणांना होईल. पण बेरोजगारीच्या कॅन्सरवर याचा काहीही सकारात्मक परिणाम होणार नाही. याचे कारण असे की, हजारो कोटींची उलाढाल करणाऱ्या भांडवलप्रधान उद्योगात नव्या तरुणांना कुठे व कसे सामावून घ्यायचे हा यक्ष प्रश्न त्यांच्यापुढे असणार आहे. सरकारी दडपणामुळे सुरुवातीला काही दिवस या कंपन्या काही किरकोळ रोजगार देतील, पण नंतर या तरुणांना 'कमी' करतील! दुसरा मुद्दा असा की, औद्योगिक क्षेत्रात सध्या कॉन्ट्रॅक्ट लेबर पद्धतीने भरती केली जाते. यात मूळ कंपनीची कोणतीच आर्थिक जबाबदारी कामगारांप्रति राहत नाही. त्यामुळे वरील योजनेमार्फत किती भरती होईल, हा प्रश्न आहे. उद्योग व्यवसाय नफ्यासाठी चालतात. त्यात 'कॉस्ट बेनिफिट' विश्लेषण केले जाते व निर्णय घेतले जातात! यात 'अपॉर्च्युनिटी कॉस्ट'चा विचार केला जातो. त्यामुळे ज्या गृहितकांवर व आशावादावर केंद्र सरकारने या योजना तयार केल्या आहेत त्यांच्या यशाबद्दल अनेकांच्या मनात साशंकता आहे. बेरोजगारीची समस्या सोडविल्याचा आभास केंद्र सरकार यातून निर्माण करीत आहे.
बेरोजगारीचा प्रश्न हा 'मागणीच्या बाजूने' जसा गंभीर आहे, तसा असतो 'पुरवठ्याच्या बाजूने' सुद्धा गंभीर आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या या काळात नवा रोजगार निर्माण करणे हे जगासमोर आव्हान आहे; पण त्याची गंभीर चर्चा भारतात होताना दिसत नाही.देशातील बेकारीच्या प्रश्नासाठी शिक्षण व्यवस्थेला जबाबदार धरण्याची एक प्रथा आपल्याकडे आहे. शिक्षणातून कौशल्य विकास होत नाही म्हणून बेरोजगारी आहे असे सतत म्हटले जाते हे अर्धसत्य आहे. रोजगार निर्माण करणे हे अर्थव्यवस्थेचे काम आहे, शिक्षण व्यवस्थेचे नाही हे लक्षात घेतले पाहिजे! अर्थव्यवस्थेचे धोरण 'जॉबलेस ग्रोथ' किंवा 'जॉब रिड्युसिंग ग्रोथ' असेल, तर बेरोजगारी वाढणार आहेच! एआयमुळे (कृत्रिम बुद्धिमत्ता) भविष्यात रोजगाराच्या अनेक संधी कायमस्वरूपी जगभर संपणार आहेत, त्याचा शिक्षणाशी काहीही संबंध नाही!
शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट हे स्वतंत्र बुद्धीने विचार करणारा, संवेदनशील, मानवी मूल्य जपणारा माणूस घडविणे हे आहे. शरीर, मन व बुद्धी यांचा संतुलित विकास म्हणजे शिक्षण! प्रज्ञा, शील व करुणेचा विकास करणे म्हणजे शिक्षण! केवळ बुद्धीचा विकास किंवा केवळ शारीरिक कौशल्याचा विकास घडवून आणणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर ती विकृती आहे. केवळ पुस्तकी पंडित किंवा कुशल कामगार निर्माण करणे म्हणजे शिक्षण नव्हे! आमिर खानच्या 'थ्री इडियट'मध्ये एक संवाद आहे, तो असा, छडीच्या धाकाने सर्कशीत सिंह उडी मारून खुर्चीत बसतो, त्याला आपण 'वेल ट्रेन्ड' म्हणतो, 'वेल एज्युकेटेड' म्हणत नाही! भारतीय समाजात व त्यामुळे शिक्षणात बुद्धी व श्रम यांची फारकत आहे. भारतात श्रमाला प्रतिष्ठा नाही ही मुळातील समस्या आहे. हातांनी केलेले काम व बुद्धी यांची सांगड घालण्याचे काम महात्मा गांधींनी 'बुनियादी तालीम'मध्ये केले होते; पण याचे महत्त्व शिक्षण धोरणात आजही लक्षात घेतले गेलेले नाही. हे सर्व समस्यांचे मूळ आहे.
'कौशल्य विकास' हा स्वतंत्र विषय शिकून श्रम प्रतिष्ठा वाढणार नाही. हाताने केलेले काम हेच शिक्षणाचे माध्यम झाले तरच कौशल्य विकासाची समस्या सुटेल. दुसऱ्या बाजूला 'ग्रोथ विथ एम्प्लॉमेंट' हे अर्थव्यवस्थेचे धोरण राहिले तरच 'डीमोग्रोफिक डिव्हिडंट' भारताला मिळू शकेल, अन्यथा भारतातील तरुण लोकसंख्या ही भारताची संपत्ती न राहता ते दायित्व ठरेल! केंद्र सरकारच्या सध्याच्या योजना म्हणजे अर्थव्यवस्थेतील अग्निवीर योजना आहे.

# ग्रंथालयाचे महत्त्व



ग्रंथालय म्हणजे ज्ञानाचा भांडार. पुस्तकांचे संग्रहालय म्हणजे ग्रंथालय. ग्रंथालय हे विद्यार्थ्यांसाठी, संशोधकांसाठी, तसेच सर्वसामान्य माणसासाठी ज्ञानाचा स्त्रोत आहे. याठिकाणी विविध प्रकारची पुस्तके, संदर्भग्रंथ, मासिके, वृत्तपत्रे इत्यादी साहित्य उपलब्ध असते. ग्रंथालयामुळे माणसाची बौद्धिक आणि वैचारिक वाढ होते. ग्रंथालय म्हणजे सर्वसाधारणपणे सर्व प्रकारची छापील तसेच हस्तलिखित माहितीसाधने एकत्रितपणे ठेवण्याची जागा होय. प्राचीन भारतात नालंदा विश्वविद्यालयाचे अति समृद्ध ग्रंथालय होते. मध्ययुगीन काळामध्ये हस्तलिखित पोथ्या जतन करून ठेवल्या जात. राजे–महाराजे आपला स्वतंत्र ग्रंथसंग्रह ठेवत असत. ग्रंथालय शास्त्राचे तज्ज्ञ एस.आर. रंगनाथन यांच्या मते, ग्रंथालये ही लोकशाही मूल्ये जोपासणारी सार्वजनिक संस्था आहे.

शाळा–महाविद्यालयांना ग्रंथालय असतेच. यामुळे विद्यार्थ्यांना संदर्भासहित वाचनाची सवय लागते. लिखाण अभ्यासपूर्ण होण्यासाठी अनेक ग्रंथ एकाच ठिकाणे मिळण्याची सोय होते. ग्रंथालयात अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे एक महत्त्वाचे साधन आहे. विविध विषयांवरची पुस्तके वाचनासाठी उपलब्ध असल्याने विद्यार्थी स्वतःच्या आवडीनुसार पुस्तकांचे वाचन करू शकतो. परीक्षा तयारीसाठी संदर्भग्रंथ, मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिका व इतर शैक्षणिक साहित्य या ठिकाणी मिळू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांची अभ्यासातील गुणवत्ता सुधारते. ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचे संग्रहालय नसून ते एक वैचारिक केंद्र आहे. इथे विविध लेखकांची, विचारवंतांची आणि तत्त्वज्ञांची पुस्तके उपलब्ध असतात. त्यामुळे वाचकांना विविध विचारधारा समजण्यास मदत होते. त्यातून माणसाचा दृष्टिकोन व्यापक होतो आणि त्याच्या विचारांची खोली वाढते.

वाचक, वाचन साहित्य आणि कर्मचारी हे ग्रंथालयाचे तीन घटक आहेत. ग्रंथालयाचा मूळ उद्देश ज्ञान व माहिती संग्रहण हा असतो. ग्रंथालयातून ही साधने वापरण्यासाठी नेता येतात व मर्यादित कालावधीत परत केली जातात. आधुनिक काळात ग्रंथालयांची संकल्पना बदलून ते माहितीचे देवाण – घेवाण करणारी संस्था अशी झाली आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेटचा वापर वाढला असला तरी ग्रंथालयाचे महत्त्व अजूनही कायम आहे. इंटरनेटवर मिळणारी माहिती अनेक वेळा विश्वासार्ह नसते, तर ग्रंथालयातील पुस्तके लेखकाच्या नावाने आणि संपादकाच्या तपासणीनंतर प्रकाशित झालेली असतात. त्यामुळे ती अधिक विश्वसनीय असतात. ग्रंथालयातील शांत वातावरणामुळे वाचनाची गोडी लागते आणि एकाग्रतेने वाचन करता येते.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी 'गाव तेथे ग्रंथालय' असावे, असे मत व्यक्त केले. महाराष्ट्रात सार्वजनिक ग्रंथालयांची उपयुक्तता ध्यानात घेऊन १९६७ साली 'महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम' हा कायदा अमलात आला. महाराष्ट्रात मान्यताप्राप्त ग्रंथालय संघांना ग्रंथालय संचालनालयामार्फत अनुदान देण्यात येते. ग्रंथालयाच्या माध्यमातून संस्कृतीचे जतन होते. विविध भाषांतील साहित्य, ऐतिहासिक ग्रंथ, धर्मग्रंथ या ठिकाणी जपून ठेवले जातात. त्यामुळे भविष्यातील पिढ्यांना या साहित्याचा लाभ होतो. तसेच, समाजातील वाचन संस्कृती वाढवण्याचे कार्यही ग्रंथालय करते.
ग्रंथालय हे समाजाच्या सांस्कृतिक, शैक्षणिक आणि बौद्धिक उन्नतीचे केंद्र आहे. वाचनाच्या सवयीमुळे माणसाची मानसिक क्षमताही वाढते. त्यामुळे प्रत्येकाने ग्रंथालयाचा वापर करावा, असे मी मानतो. आजच्या गतिमान जीवनात थोडा वेळ काढून ग्रंथालयात जाऊन वाचन करणे ही अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. ग्रंथालयाचे महत्त्व ओळखून त्याचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असेच मला वाटते.

**–श्री धनंजय वसंतराव पवार**
**हासाळा ता. औसा जि. लातूर**
**९४२२२५१०३०**

# मनुष्य जीवन आणि योग



मनुष्य जीवन म्हणजे जगण्याची कला, आणि योग ही त्या कलेची पूर्णता आहे. योग हा फक्त व्यायाम नाही, तर शरीर, मन, आणि आत्म्याचा समतोल साधण्याची एक संपूर्ण प्रक्रिया आहे. योगाच्या माध्यमातून आपण आपल्या आंतरिक शक्तींचा विकास करतो आणि जीवनातील विविध समस्यांचा सामना करण्याची ताकद मिळवतो. आज विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे खूप सारी नवीन नवीन साधने विकसित झाली आहे. या साधनांमुळे मनुष्याचे श्रमकार्य कमी झाले आहे. यामुळे मनुष्यामध्ये आळस वाढत आहे व तो व्यायामाकडे दुर्लक्ष करीत आहे. आपल्या धार्मिक ग्रंथांमध्ये व्यायामाचे महत्त्व सांगितले आहे. धार्मिक ग्रंथांचे मानने आहे की जर धन गेले तर ते आपण पुन्हा मिळवू शकतो, मनुष्य हा धनाशिवाय जिवंत राहू शकतो. परंतु जर स्वस्थ बिघडले तर आपले संपूर्ण जीवनच निरर्थक होऊन जाते.

मनुष्य जीवन हे अनेक अडचणी, संकटे, आणि तणावाने भरलेले असते. आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे माणूस शारीरिक आणि मानसिक तणावाने ग्रस्त होतो. या तणावाचा सामना करण्यासाठी आणि शरीर–मनाला शांत ठेवण्यासाठी योग हा एक प्रभावी उपाय आहे. योगाच्या माध्यमातून आपण शारीरिक आरोग्य आणि मानसिक शांतता मिळवू शकतो. मनाची शांती आणि तणावमुक्ती हे योगाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. ध्यानाच्या माध्यमातून मनाची एकाग्रता वाढते, आणि तणाव कमी होतो. ध्यानामुळे आपण आपल्या आंतरिक विचारांची ओळख करतो आणि मानसिक शांतीचा अनुभव घेतो. आजच्या युगात, जिथे मनुष्याच्या आयुष्यात स्थिरता आणि आनंदाची कमतरता आहे, तिथे ध्यान आणि योगाच्या माध्यमातून ती पूर्ण करण्याचा प्रयत्न होतो. योगाच्या नियमित अभ्यासामुळे मनुष्याच्या जीवनात सकारात्मकता येते. जीवनाच्या विविध पैलूंवर योगाचा परिणाम दिसून येतो. शारीरिक आरोग्य, मानसिक स्थिरता, आणि आध्यात्मिक उन्नती या तिन्ही गोष्टींचा योगामुळे विकास होतो. योग ही केवळ शारीरिक क्रिया नसून, ती जीवन जगण्याची एक समृद्ध पद्धत आहे.

मनुष्य तेव्हाच सुखी राहू शकतो जेव्हा त्याचे शरीर निरोगी आणि तंदुरुस्त असेल. स्वस्थ शरीरासाठी नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. एक निरोगी शरीर प्राप्त करण्यासाठी व्यायामाचे महत्त्व भरपूर आहे, नियमित व्यायाम केल्याने शारीरिक सुखासोबत मनुष्याला मानसिक संतुष्टी ची प्राप्ती होते. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे व्यायाम केल्याने शरीरात असलेली जास्तीची चरबी काढून टाकण्यात मदत होतें. शरीरावर असलेली ही अत्याधिक चरबी शरीराला नुकसान पोहचवत असते. ज्यामुळे अनेक रोग निर्माण होण्याची देखील शक्यता असते. व्यायाम केल्याने ही चरबी कमी करून अनेक शारीरिक रोगापासून दूर राहिले जाऊ शकते. असे मानले जाते की नियमित व्यायामाने लोक लवकर वृद्ध होत नाही आणि शरीरात तंदुरुस्ती राहते. जर शरीर स्वस्थ राहील तर मनही शांत राहते आणि बुद्धीचा विकास होतो. ज्यामुळे कार्यक्षमता वाढून कोणत्याही क्षेत्रात यश मिळवणे शक्य होते. म्हणून प्रत्येककाने आपल्या व्यस्त जीवन शैलीतील काही वेळ काढून व्यायामास द्यायला हवा.

भारतीय संस्कृतीत योगाला विशेष स्थान आहे. हजारो वर्षांपासून योग साधनेचे महत्त्व ओळखले गेले आहे. भगवान श्रीकृष्णाने भगवद्गीतेमध्ये योगाचे महत्त्व सांगितले आहे. पातंजलि ऋषींनी योगसूत्रांच्या माध्यमातून योगाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास मांडला आहे. योगामुळे मनुष्य जीवनातील तणाव, अशांतता, आणि अस्वस्थता दूर होतात. त्याचबरोबर जीवनात एक नवीन ऊर्जा आणि उत्साह प्राप्त होतो. योगाच्या साधनेतून आपल्याला जीवन जगण्याची कला शिकायला मिळते, जी आपल्या दैनंदिन जीवनात अमूल्य ठरते. व्यायामाचे कोणतेही दुष्परिणाम नाही आहेत. म्हणून लोकांनी नियमित व्यायाम करून आपले जीवन सुखी व निरोगी बनवायला हवे.

योग हे एक जीवनशैली आहे जी मनुष्याच्या संपूर्ण आरोग्याचे रक्षण करते आणि त्याच्या जीवनाला एक नवीन दिशा देते. योगाच्या माध्यमातून आपण आपल्या जीवनाला अधिक सुंदर, शांत, आणि समृद्ध बनवू शकतो.

**–श्री धनंजय वसंतराव पवार**
**हासाळा ता. औसा जि. लातूर**
**९४२२२५१०३०**

# छद्म विज्ञानाचे फसवे दावे पारखून घ्या

विज्ञानाचे नाव घेत वेगवेगळ्या थेरपी, वेगवेगळी शास्त्र उदयाला आलेली आहेत. आम्ही जे सांगत आहोत ते वैज्ञानिक आहे, असा दावा करत भ्रामक विज्ञान आपला विस्तार करत आहे. विज्ञानावर असलेल्या लोकांच्या विश्वासाचा गैरफायदा घेत भ्रामक विज्ञान लोकांची फसवणूक करत असते. लोकांच्या आरोग्याशी, भावनांशी खेळतानाच आर्थिक शोषणही केले जाते. म्हणूनच छद्म विज्ञानाचे हे सोंग ओळखणे आवश्यक आहे. मात्र यासाठी पारखणे, पडताळणी करणे आणि मुख्य म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे गरजेचे आहे.
छद्म विज्ञान हे खऱ्या विज्ञानाचे एक सोंग असते. त्याला 'फसवे विज्ञान' वा 'भ्रामक विज्ञान' असेही म्हणता येईल. ह्या भ्रामक विज्ञानाचे एक उदाहरण प्रसिध्द आहे. २००० साली चेन्नई येथील रामन पिल्लई नावाच्या व्यक्तीने आपण शास्त्रज्ञ असल्याचा आव आणून आपल्याला पाण्यापासून डिझेल बनविण्याची एक पद्धत अवगत आहे,असा दावा केला होता. आय.आय.टी. मधील तज्ज्ञांनी केलेल्या चाचणीत त्याची फसवाफसवी उघडकीस आली. पाणी ढवळण्यासाठी पिल्लई जो दांडा वापरत होता तो पोकळ होता. त्यात थोडे डिझेल आधीच भरून घेऊन तो ते अलगद पाण्यात मिसळत असे. पुढे सीबीआयने त्याची चौकशी केली आणि आपण फसवाफसवी करीत असल्याचे त्याने कबूल केले.
छद्म विज्ञानाची काही व्यवच्छेदक लक्षणे आहेत. मुख्य म्हणजे फसवे विज्ञान कुठल्याही मान्यवर संस्थांमधून शिकविले जात नाही. छद्म विज्ञानाचे दावे कधीच मान्यताप्राप्त जर्नल्समधून, संशोधन पत्रिकांमधून प्रसिध्द केले जात नाहीत. विज्ञानातील आरोग्यविषयक संशोधन 'लॅन्सेट' मध्ये आणि भौतिकशास्त्रासंबंधीचे शोध 'नेचर' मध्ये छापले जातात. या दोन्ही जागतिक पातळीवरची मान्यता असलेल्या संशोधन पत्रिका आहेत. त्यामुळे इथे ज्या बाबी संशोधनाच्या मान्यताप्राप्त पद्धतीशास्त्रानुसार संशोधकांनी पडताळून पाहिलेल्या आहेत, असेच संशोधनविषयक लेख प्रसिद्ध होतात. परंतु छद्म विज्ञानातील दावे सरळ सरळ टेलिव्हिजन अथवा वर्तमानपत्रे अशा सत्यता न पडताळता तत्काळ प्रसिद्धी देणाऱ्या माध्यमांमध्ये प्रसिद्ध केले जातात. विज्ञानाचा आभास निर्माण करण्यासाठी वापरलेल्या तांत्रिक शब्दांची ते व्याख्या करीत नाहीत. त्यांनी पुढे केलेले पुरावे वादग्रस्त असतात. फोटो दिलेले असलेच तर ते अस्पष्ट असतात. त्यात तांत्रिक वा शास्त्रीय परिभाषेऐवजी काव्यमय भाषा असते. ते वर्णन सुरस, चमत्कारिक गोष्टींसारखे वाटते. उदा. सूक्ष्म देह धारण करून मंगळावर गेल्याचा दावा करणारे डॉ. पु. वा. ओक अशी वर्णने करतात. आपले मौलिक संशोधन दाबून टाकायचा प्रयत्न जगातील मान्यवर संस्था करीत आहेत अशी तक्रार छद्म वैज्ञानिक करतात. उदा. परदेशी तेल कंपन्या माझे मौलिक संशोधन दडपून टाकायचा प्रयत्न करीत आहेत, असा दावा रामन पिल्लई करत असे. आपल्यावर होणाऱ्या टीकेला उत्तर देण्याऐवजी ही मंडळी टीकाकारावरच हल्ला करतात.विज्ञानात गृहितक,अनुमान, प्रयोग, प्रचिती, पुनःपुन्हा पडताळणी आणि प्रचिती अशा पायऱ्या असतात. त्यानंतरच निष्कर्ष काढला जातो. नवीन पुरावे मिळाले तर आधीच्या निष्कर्षात योग्य तो बदल केला जातो. त्याच्या मर्यादा मान्य केल्या जातात. खरे विज्ञान असे नम्र असते. याउलट फसव्या विज्ञानात कार्यकारणभाव नसतो आणि प्रश्न विचारता येत नाहीत.
प्रत्येक विज्ञानशाखेशी संबंधित एक छद्म विज्ञान उदयाला येते. १७ व्या शतकाच्या सुरुवातीला विज्ञानाचा उदय झाल्यावर विविध प्रकारच्या उर्जांचा शोध लागला. जेम्स वॅट यांचा वाफेच्या ऊर्जेचा शोध प्रसिद्ध आहे. अणू ऊर्जा, सूर्य ऊर्जा, आघातातून निर्माण



होणारी ध्वनी ऊर्जा अशा विविध ऊर्जा भौतिक शास्त्रात अभ्यासल्या जातात. ह्या ऊर्जा मोजण्याची शास्त्रीय एकके असतात. जसे ध्वनी ऊर्जा ही डेसिबल्समध्ये तर विद्युत शक्ती वॉट्समध्ये मोजतात. परंतु छद्म विज्ञानामध्ये मंगळ, शनी अशा ग्रह गोलांपासून वैश्विक ऊर्जा निघते आणि ती निवडक माणसांचे भविष्य ठरविते, असे सांगितले जाते. वास्तूशास्त्र या छद्म विज्ञानात प्रत्येक वास्तूमध्ये 'धन' आणि 'ऋण' ऊर्जा खेळत असते, असे सांगितले जाते. रेकीत 'तरंग' ऊर्जा रोग–उपचाराचासाठी वापरली जाते, असा दावा केला जातो. थोडक्यात, कोणतेही वैज्ञानिक मोजमाप करता न येणाऱ्या ऊर्जा वेगवेगळ्या नावाने ह्या फसव्या विज्ञानात धुमाकूळ घालत असतात. रसायनशास्त्राशी निगडीत अल्केमी हे छद्म विज्ञान खूप जुने आहे. त्यात धातूचे सोने बनविणारा परिस असल्याचा दावा केला जातो.स्थापत्यशास्त्राशी नाते सांगणारे फसवे वास्तुशास्त्र सध्या खूपच लोकप्रिय होत आहे. त्यात आग्नेय दिशेला अग्नी म्हणजे शेगडी/चूल असावी तर पश्चिम दिशेला वेस्टपेपर बास्केट असावे म्हणजे घरात समृध्दी नांदेल, असे हास्यास्पद दावे केले जातात. मॅग्नेटिझमशी संबंधीत चुबंकीय उपचार पद्धती हेही छद्म विज्ञानाचे एक खूप प्रचलित उदाहरण आहे. सर्व प्रकारचे रोग दूर करणारे चुबंकीय पट्टे, माळा, गाद्या ह्यांचे जोरदार मार्केटिंग चालते. ह्या उपचार पध्दतीने बऱ्या होणाऱ्या मधुमेहापासून ते कर्करोगापर्यंतच्या शंभर एक रोगांची यादी आपल्याला इंटरनेटवरील त्यांच्या संकेतस्थळावर पहावयास मिळते. ह्या उपचार पद्धतीमागील गृहितकच चुकीचे आहे. आपल्या रक्तात हिमोग्लोबिन असते व त्यात लोहाचा अंश असतो हे खरे. पण हे लोह धनभारीत आणि रेणुबंधित असते. त्याला चुंबक आकर्षित करू शकत नाही. त्यामुळे चुंबकाचा रक्तावर परिणाम होऊन रक्ताभिसरण सुधारते हे खरे नाही. खगोलशास्त्राशी संबंधित छद्म विज्ञान म्हणजे ज्योतिष. त्यात माणसाच्या कुंडलीत राहू, केतू ह्या काल्पनिक बिंदूना आणि सूर्य ह्या ताऱ्यालाच ग्रह मानलेले आहे. आणि त्या आधारे तयार केलेल्या कुंडलीवरून माणसाचे भविष्य सांगितले जाते. पंचांगावरून शुभ–अशुभ मुहूर्त ठरविले जातात. वैद्यकशास्त्राशी निगडीत रेकी, कुंडलिनी जागृत करणे, गर्भसंस्कार करणे आणि अनेक फसव्या उपचार पद्धती पर्यायी उपचार पद्धती म्हणून धुमाकूळ घालत आहेत.लोक अशा फसव्या छद्म विज्ञानाच्या मागे का जातात, तेही पाहिले पाहिजे. माणूस हा उपजतच एक भावनाशील प्राणी आहे. कशावर तरी श्रद्धा ठेवावी, अशी त्याची मानसिकता असते. प्रश्न विचारणे, खरे–खोटे पारखणे ह्या गोष्टी त्याला शिकवाव्या लागतात.बऱ्याच वेळा स्युडो सायन्सवरील विश्वास त्याला मोठेपणाची, आत्मगौरवाची भावना देतो. अनेकदा आजूबाजूचे लोक, मित्र, आईवडील विश्वास ठेवतात म्हणून चिकित्सा न करता इतरही अनेक त्यावर विश्वास ठेवतात. आजूबाजूचे सर्वच घरातल्या एखाद्या कार्यासाठी शुभमुहूर्त बघतात म्हणून इतर लोकही कसलीच चिकित्सा न करता मुहूर्ताच्या मागे लागतात.वरकरणी वाटणारी ही श्रद्धा प्रत्यक्षात जरी अंधश्रद्धा असली तरी ती लोकांच्या मनात एक खोटी आशा निर्माण करते. विज्ञानाच्या कसोट्या लावून जर या पर्यायी उपचारपद्धती तपासल्या आणि त्यात काही तथ्य आढळून आले तर नक्कीच विज्ञान त्याचा स्वीकार करेल.छद्म विज्ञानात केलेले सर्वच दावे फेटाळून न लावता त्याला चिकित्सकपणे सामोरे गेले पाहिजे. उदाहरणादाखल वास्तुशास्त्रात जमिनीची परीक्षा करण्याची एक पद्धत दिली आहे. त्यात म्हटले आहे की, घरासाठी जमीन निवडताना एक कंबरेइतक्या खोलीचा खड्डा खणा. मग त्यात पाणी भरा आणि शंभर पावले चालून परत या. पाणी जास्त खाली गेले नसेल तर जमीन चांगली. नंतर खड्ड्यातले पाणी काढून त्यात काढलेली माती परत भरावी. सर्व माती मावली तर जागा घर बांधण्यास योग्य नाही. थोडी माती उरली तर त्या जागेवर घर बांधण्यास हरकत नाही. वरील परीक्षेत अपरोक्षपणे जमिनीचा सच्छिद्रपणा आणि माती घट्ट आहे की भुसभुशीत आहे, हे तपासले जाते. जेव्हा जमिनीची पत तपासण्याची आधुनिक उपकरणे उपलब्ध नव्हती तेव्हा वापरण्यात येणारी ही पद्धत कौतुकास्पद आहे.शोषण करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध करणे हे अंनिसच्या पंचसूत्रीमधील एक सूत्र आहे. छद्म विज्ञानामुळे लोकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक व शारीरिक नुकसान होते. प्रसंगी शोषण होते. तेव्हा या फसव्या विज्ञानाला आळा घालणे हे आपले काम आहे. त्यासाठी आपल्याला वैज्ञानिक संज्ञांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. ड्रग्ज अँड मेडिकल रेमेडिज् ऑब्जेक्शनेबल डव्हर्टाइजमेंट क्टचा पण या कामात उपयोग होतो. थोडक्यात, पारखा, पडताळून पहा आणि मगच विश्वास ठेवा.

# प्रशासकीय अधिकारी होण्याच्या स्वप्नांना 'एमआयटी एडीटी'चे पंख

**पुणे**–सध्याच्या युगात केंद्रीय लोकसेवा आयोग(युपीएससी) किंवा राज्य लोकसेवा आयोग (एमपीएससी) यांसारख्या स्पर्धापरिक्षांचा अभ्यास करणे, म्हणजे मायाजाळात फसण्यासारखे समजले जाते. बऱ्याचदा प्रशासकीय अधिकारी होण्याचे स्पप्न उराशी बाळगुण, दरवर्षी लाखो विद्यार्थी कुठल्याही बॅकअप प्लॅनशिवाय स्पर्धापरिक्षांचा अभ्यास करतात.

त्यात, पदवीपासूनच स्पर्धापरिक्षांच्या योग्य मार्गदर्शनाचा अभाव, अनेक प्रयत्नांनंतरही आलेले अपयश, वाढते वय या सर्व गोष्टींमुळे विद्यार्थ्यांचा भ्रमनिरास होतो. ही समस्या ओळखूनच विद्यार्थ्यांच्या प्रशासकीय अधिकारी होणाच्या स्पप्नांना यशस्वीतेचे पंख लावण्याचा संकल्प एमआयटी एडीटी सारख्या अग्रगण्य विद्यापीठाने केला आहे, असे मत, एमआयटी स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेसचे




(एसआयसीएस) संचालक डॉ. सुजित धर्मपात्रे यांनी व्यक्त केले.

ते येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. डॉ.धर्मपात्रे पुढे म्हणाले, सनदी सेवा परिक्षांसाठी दरवर्षी लाखो विद्यार्थी बसतात. त्यासाठी पदवीनंतर ते दिल्ली अथवा अन्य शहारांत लाखोंचा खर्च करून क्लासेस करतात. परंतू, योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने त्यातील खूपच कमी विद्यार्थ्यांच्या हाती यश लागते. परंतू, बाकीच्या विद्यार्थांचे पुढे काय होते, याचा विचार आपण कधी करतो का? अशाच विद्यार्थ्यांना स्पर्धापरिक्षेसाठी आवश्यक मार्गदर्शन व त्याचवेळी त्यांच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगिण विकास करणारा अभ्यासक्रम उपलब्ध करूण देण्यासाठीच, एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठामध्ये स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेसची स्थापना करण्यात आली.

बारावीनंतर युपीएससी व राज्यसेवा परिक्षांसह अन्य सरकारी सेवांचा अभ्यास करू पाहाणाऱ्या विद्यार्थ्यांना तज्ज्ञांच्या मार्गदर्शनासह बी.ए. एडमिनिस्ट्रेशन या पदवी आणि आणि एम.ए. पब्लिक एडमिनिस्ट्रेशन या पद्युत्तर अभ्यासक्रमाद्वारे शिक्षण देणारी एमआयटी एसआयसीएस ही भारतातील एकमेव अग्रगण्य संस्था आहे.

हा अभ्याक्रम तयार करण्यामागे युपीएससीचे माजी चेअरमन डॉ.डी. पी. अग्रवाल, तेलंगणाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक महेश भागवत, नाबार्डचे माजी चेअरमन डॉ. एम.एल. सुखदेवे व अनेक तज्ज्ञांचे योगदान आहे. या त्रिस्तरीय स्पर्धा परिक्षेमध्ये विद्यार्थी उत्तीर्ण होण्याकरीता अभ्यासासोबतच त्यांच्या आवडी-निवडी ओळखून कौशल्याधिष्ठीत प्रशिक्षण देणाऱ्या विषयांचा अभ्यासक्रमात समावेश केलेला आहे.

हा पदवी अभ्यासक्रम पूर्ण निवासी असून यात मर्यादित विद्यार्थीसंख्या ठेवून गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणावर भर दिला जातो. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक विकासासाठी एमआयटी स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेस सदैव कार्यरत आहे.

यासोबतच पदवीनंतर विद्यापीठांमध्ये एमबीए, लॉ, डिझाइन इत्यादी असे पदव्युत्तर अभ्यासक्रमही शिकता येणार आहेत. या पदव्युत्तर अभ्यासक्रमांमुळे दुर्दैवाने जे विद्यार्थी स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होणार नाहीत, त्यांना इतर खासगी क्षेत्रांमध्ये नोकरीची संधी प्राप्त होईल. तरी, अधिक माहितीसाठी www.mitsics.edu.in या संकेतस्थळावर अथवा, ९६०७५८००४२/५२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# गोपाळ फुलसुंदर यांची जिल्हा परिषद सिंधुदुर्ग येथे शिक्षकपदी नियुक्ती झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने सत्कार



**लोहारा**–लोहारा तालुक्यातील वडगाव गां येथील गोपाळ फुलसुंदर यांची जिल्हा परिषद सिंधुदुर्ग येथे शिक्षकपदी नियुक्ती झाल्याबद्दल वडगांव नगरीचे विद्यमान उपसरपंच बबन फुलसुंदर व ग्रामस्थांच्या वतीने यथोचित्त सत्कार करण्यात आला, यावेळी समतादूत नागेश फुलसुंदर, मंडळाचे पदाधिकारी परमेश्वर पवार, लक्ष्मण पवार, रामेश्वर यलोरे, दिलीप पवार, सागर पवार, अविनाश चौगुले, रखमाजी जाधव, ज्ञानेश्वर पाटील, नितीन पवार, वलीपशा सय्यद, बाशा शेख, सुकाचारी फुलसुंदर, संगीता फुलसुंदर, प्रिया फुलसुंदर आदी उपस्थित होते. यावेळी गोपाल फुलसुंदर यांनी आपले अनुभव कथन केले, त्यांनी अत्यंत बिकट परिस्थितीत शिक्षण घेऊन अभ्यास करून हे यश संपादन केले आहे. हा अत्यंत हुशार, जिद्द चिकाटी असणारा, मोलमजुरी करून पोटाची खळगी भरणाऱ्या कुटुंबातील मुलगा, अहोरात्र अभ्यास करून जिल्हा परिषद सिंधुदुर्ग येथे शिक्षकपदी रुजू झाला, त्याचे सर्वच ठिकाणातून कौतुक केले जात आहे. याकामी वेळोवेळी पुस्तकरूपी सहकार्य केलेले उपसरपंच बबन फुलसुंदर यांनीही यावेळी युवकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व मनोगत समतादूत नागेश फुलसुंदर यांनी केले तर आभार परमेश्वर पवार यांनी मानले. या कार्यक्रमास ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अरविंद केजरीवाल यांना 'सर्वोच्च' दिलासा

**नवी दिल्ली**–कथित मद्य घोटाळा प्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मद्य घोटाळ्याशी संबंधित सीबीआय प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांना जामीन मंजूर केला. अरविंद केजरीवाल आज तिहार तुरुंगातून बाहेर येणार आहेत. गेल्या १७७ दिवसांपासून ते तुरुंगात होते.

ज्येष्ठ विधिज्ञ अभिषेक मनु सिंघवी यांच्या यांनी केजरीवाल यांच्या बाजूने युक्तीवाद केला. केजरीवाल यांनी जामिनासह अटकेलाही आव्हान दिले होते. अखेर शुक्रवारी अरविंद केजरीवाल यांना १० लाखांच्या जात मुचलक्यावर सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | 2 | 1 | 9 | | 8 | 5 |
| | | 2 | | 6 | 4 | | | |
| 5 | | | 3 | | | 4 | 9 | |
| 3 | | | 8 | | 2 | 1 | | |
| | | | | 9 | | | | |
| | | 9 | 1 | | 3 | | | 6 |
| | 3 | 5 | | | 8 | | | 4 |
| | | | 7 | 4 | | 3 | | |
| 6 | 8 | | 9 | 3 | 1 | | | 7 |

कालच्या सुडोकोचे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 7 | 3 | 2 | 1 | 9 | 6 | 8 | 5 |
| 8 | 9 | 2 | 5 | 6 | 4 | 7 | 3 | 1 |
| 5 | 1 | 6 | 3 | 8 | 7 | 4 | 9 | 2 |
| 3 | 6 | 7 | 8 | 5 | 2 | 1 | 4 | 9 |
| 1 | 5 | 8 | 4 | 9 | 6 | 2 | 7 | 3 |
| 2 | 4 | 9 | 1 | 7 | 3 | 8 | 5 | 6 |
| 7 | 3 | 5 | 6 | 2 | 8 | 9 | 1 | 4 |
| 9 | 2 | 1 | 7 | 4 | 5 | 3 | 6 | 8 |
| 6 | 8 | 4 | 9 | 3 | 1 | 5 | 2 | 7 |

## सुडोको

आपले थोडे डोके वापरा आणि करा नंबरची अदला बदल.जेवढया लवकर आपण हे कोडे सोडवताल तेवढे आपल्याला हुषार समजण्यात येईल.खेळाचे नियम :- प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतू ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे.

प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.




## उपदेशकथा

एका गृहस्थाच्या घरी एक दिवस एक खास मित्राला मेजवानी होती. त्याचा एक कुत्रा होता. त्यानेही आपल्या एका दोस्त कुत्र्याला त्याच दिवशी आपल्याकडे जेवणाचे आमंत्रण दिले. तो कुत्रा जेव्हा आला तेव्हा तयार होत असलेले चमचमीत जेवणाचे पदार्थ पाहतच राहिला. त्याला आनंदाच्या उकळ्या फुटू लागल्या तो म्हणाला, काय मस्त मेजवानी मिळणार आज. अगदी पोट फुटेपर्यंत मी आज खाणार आहे. मग पुन्हा परवा सकाळपर्यंत पुन्हा खायला नको.

आपल्या मित्रांवरच प्रेम दाखविण्याकरता तो आपली शेपटी हालवत राहिला. पण त्या शेपटीच्या वळवळ्यामुळे तिथल्या

## ऐट

स्वयंपाक्याचे लक्ष त्याच्याकडे गेले आणि त्याने ताबडतोब त्याचे पाय धरून त्याला घराबाहेर फेकून दिले. अर्थात रागाने आणि निराशेने भूकंत भूकंत तो आपल्या घरी निघाला. वाटेत त्याला त्याचा दुसरा मित्र भेटला. त्याने विचारले, काय कसं काय होत जेवण? काही विचारू नको, तो म्हणाला, अरे, तेथे इतकी दारू होती की, मी तिच्यावर ताव मारला. त्या घरातून मी कसा बाहेर पडलो ते देखील मला समजत नाही.

कथा उपदेश : दुसऱ्याच्या जीवावर जे जे आपल्याला चांगल्या गोष्टी देण्याचा आव आणतात त्यांच्यावर विश्वासून चालणे बरे नाही.

# पावसाळ्यात मेकअप खराब होतो?

प्रत्येकजण पावसाची आतुरतेने वाट पाहत असतो आणि अखेर तो क्षण आला जेव्हा मान्सूनचे आगमन झाले. जसजसा पाऊस पडतो आणि हवा दमट होते, त्वचेची काळजी घेणे आव्हानात्मक होते, विशेषत: मेकअपसह. मेकअप 'अप टू द मार्क' कसा ठेवायचा ते शिका. वॉटर-प्रूफ फाउंडेशन आणि स्मज-प्रूफ आयलाइनर निवडण्यापासून ते पावसाळ्यातील स्किनकेअर रूटीनपर्यंत जाणून घ्या मेकअप टिप्स.

मान्सून मेकअप टिप्स : काहींची ऋतू कोणताही असो मेकअपची स्टाईल सारखीच असते. बदलत्या ऋतूंनुसार आपण आपला आहार आणि कपडे बदलत असताना, त्वचेची काळजी घेण्याची दिनचर्या आणि मेकअपची दिनचर्या कशी एकच असू शकतात हे ते विसरतात. मान्सूनच्या काही मेकअप टिप्स जाणून घेऊया.

प्राइमर : एक गुळगुळीत बेस तयार करण्यासाठी आणि अतिरिक्त तेल व्यवस्थापित करण्यासाठी मेकअप करण्यापूर्वी मॅटिफायिंग प्राइमर लावा. हे मेकअप अधिक काळ टिकण्यास देखील मदत करेल.

हलका फाउंडेशन: आर्द्रता किंवा पावसाचा सामना करण्यासाठी हलका आणि जलरोधक पाया निवडा. हे मेकअप व्यवस्थित ठेवण्यास मदत करेल.

आयशॅडो, आयलायनर आणि मस्करा : पावसाळ्यात उर्वरित मेकअप कमीत कमी ठेवून डोळे आणि ओठ हायलाइट करणे चांगली कल्पना आहे. यासाठी व्हायब्रंट आणि वॉटरप्रूफ आयशॅडो निवडा. तसेच तुमचे डोळे वॉटरप्रूफ आयलायनरने परिभाषित करा. दुसरीकडे, डोळे मोठे करण्यासाठी वॉटरप्रूफ मस्करासह पापण्या कर्ल करा. ओठांसाठी ठळक शेड निवडा.

मॅटिफायिंग लिपस्टिक : पावसाळ्यासाठी, क्रीमी लिपस्टिकऐवजी मॅट किंवा सेमी-मॅट फिनिश असलेल्या लिपस्टिकची निवड करा. ते दीर्घकाळ टिकतात आणि सहजासहजी धुमसत नाहीत.

लूज पावडर घ्या : पावसाळ्यात चेहऱ्याला ओलावा किंवा तेलाचा त्रास होऊ शकतो. या प्रकरणात मेकअप सेट करण्यासाठी सैल पावडर वापरा आणि तेलात प्रवेश करण्यासाठी तेल शोषून घ्या. तुमच्या टी-झोनवर हलकेच पावडर लावा कारण हा भाग जास्त तेलकट आहे.

सेटिंग स्प्रे : शेवटी तुमचा मेकअप लॉक करण्यासाठी सेटिंग स्प्रे लावा. मॅट फिनिश आणि टिकण्यासाठी डिझाइन केलेले फॉर्म्युला ऑफर करणारे उत्पादन निवडा. हे तुमच्या मेकअपला ओलावा शोषून घेण्यास आणि जास्त काळ ताजे राहण्यास मदत करेल.

ब्लॉटिंग पेपर : मेकअप केल्यानंतर चेहऱ्यावर तेल दिसले तर त्यासाठी ब्लॉटिंग पेपर वापरा. मेकअप खराब न करता जादा तेल काढण्यासाठी ब्लॉटिंग पेपरने चेहरा हळूवारपणे दाबा.

# राशीभविष्य

**१५ सप्टेंबर २०२४ (पीएसआय)**

**मेष:** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम आपले हिशेब चोख ठेवावेत. संशयाला कोठेही जागा राहणार नाही असे बोलणे व कृती ठेवावी.

**वृषभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: दक्षिण वैवाहिक जीवनातही वेळ देणे अत्यंत हितकारक ठरेल. ठरविलेले कार्यक्रम वेळेत पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध रहा.

**मिथुन :** शुभ रंग: गुलाबी: शुभ दिशा: दक्षिण शेजाऱ्याशी संबंध सलोख्याचे होतील. नुसते गप्पाष्टकांत अडकणाऱ्या मैत्रिणीपासून सावध रहा.

**कर्क :**शुभ रंग: पांढरा., शुभ दिशा: उत्तर मुलांना शैक्षणिक क्षेत्रात किंवा खेळात प्रविण्य मिळेल. लहान लहान कोर्सेस आपले व्याक्तिमत्व फुलविणारे ठरतील.

**सिंह :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:पश्चिम कामापायी खाण्यापिण्याची बंधने विसरू नका. कामकाजासंबंधी आपला शब्द प्रमाण मानला जाईल.

**कन्या :**शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर स्वत:ची तब्येत योग्य साथ देत असेल तर काही नवे संकल्प करणे हितकारक ठरेल. शब्दापेक्षा कृतीवर विश्वास ठेवा.

**तुळ:** शुभ रंग :पांढरा, शुभ दिशा: उत्तर संततीच्या व्यावसायिक प्रश्नामध्ये अपेक्षित यश मिळेल. कोणाशीही वादविवाद वाढविणे नुकसानकारक ठरेल.

**वृश्चिक:** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पश्चिम वैवाहिक साथीदाराचा अगदी पत्नीचाही सल्ला अजिबात विसरू नका. त्यांचे अंदाज अचूक ठरतील.

**धनु:** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर कौटुंबिक उत्साह, गोड वार्तालाप व आनंदाच्या गाठीभेटी यातून उत्साह संचरेल. कोणाची बौद्धिक मक्तेदारी संपुष्टात आणाल.

**मकर :**शुभ रंग: पांढरा : शुभ दिशा: पश्चिम नोकरी-व्यवसायातील ताणतणावामुळे आजारपण उद्भवणार नाही याची काळजी घेणे. छोटे-छोटे प्रश्न प्रतिष्ठेचे बनवू नका.

**कुंभ:** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण काही सूचक स्वप्ने भविष्याचा कानोसा देणारी ठरतील. परदेश प्रवासाचे स्वप्न पुरे होईल. आहे.

**मीन :**शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: दक्षिण बोलण्यातील कटुता अहंकाररहित शब्दांनी टाळण्याचा प्रयत्न करा. पाळीव प्राण्याची जास्तीची सलगी हिसका दाखविणारी ठरेल.

**१५ सप्टेंबरला जन्मलेल्या लोकांचा भविष्य**



स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर गुरू, हर्षल व शुक्राचा प्रभाव आहे. तुमचा स्वभाव कनवाळू आहे. सर्वांबल तुम्हाला मनापासून आपुलकी वाटते. इतरांची दु:खे दूर करण्यासाठी तुम्ही झटता. तुमचे विचार क्रांतिकारक असतात. पण आपल्या विचारांनी इतरांची मने दुखावली जाणार नाहीत याची तुम्ही शक्यतो काळजी घेता. संघर्ष तुम्हाला फारसा आवडत नाही. तुमचे व्यक्तिमत्व आकर्षक व रूबाबदार असते. भरपूर पैसा मिळवून ऐश्वर्यात राहावे व जीवनाचा सौंदर्यासक्त वृत्तीने उपभोग घ्यावा याकडे तुमचा कल असतो. पैसा मिळवण्याच्या आकांक्षेचे लालसेत रूपांतर होऊ देऊ नका. जुगारी प्रवृत्ती टाळायला हवी, विनायासास धनप्राप्तीच्या योजनात नीट चौकशीनंतर पैसा गुंतवा. उपभोगाबाबत संयम बाळगा. विलासाचा अतिरेक, धूम्रपान, मद्यपान या व्यसनांमुळे किडनीचे विकार होतील.

कार्यक्षेत्र : तुमची कल्पकता व सर्जनशीलता कलाक्षेत्रात सुप्रतिष्ठित होण्यासाठी उपयोगी पडू शकेल. नाटक, चित्रपट, दूरदर्शन इ. माध्यामात लेखक, अभिनेता, निर्माता, रंगभूषा, वेषभूषाकार म्हणून कामगिरी करू शकाल. टीव्ही, टेपरेकॉर्डर, म्युझिक सिस्टिम, चित्रपटगृहे, सौंदर्यप्रसाधने, पंचतारांकित हॉटेल्स हे व्यवसायही अनुकूल आहेत. स्त्रीरोग वा प्रसूतीतज्ज्ञ म्हणूनही क्षेत्र निवडता येईल.

प्रणयी जीवन : तुमच्या व्यक्तिमत्वाची चुंबकशक्ती जास्त असल्याने भिन्नलिंगी व्यक्तीत तुमची लोकप्रियता वाढती असते. बऱ्याच वेळा परिचयातून प्रेमाकडे वाटचाल होऊन विवाह लवकर जुळून येतो. आपला जोडीदार देखणा, जीवनाचा रसिक वृत्तीने उपभोग घेणारा असावा असे तुम्हास वाटते. एप्रिल २१ ते मे २० दरम्यानच्या व्यक्ती अनुरूप ठरतील.

वर्षफळ : देवघेवीच्या व्यवहारात अडचणी निर्माण होतील. कटु भाषेचा वापर टाळा. तडजोडीची भूमिका श्रेयस्कर ठरेल. जुलै ऑगस्ट मध्ये भागीदारीच्या व्यवहारात नफा कमवाल. सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये प्रकृतीच्या तक्रारींकडे वेळीच लक्ष्य द्या. डिसेंबर जानेवारी मध्ये बढतीसाठी केलेले प्रयत्न यशस्वी ठरतील. मार्च एप्रिल मध्ये जागाखरेदीचा विचार पक्का होईल. मे जून मध्ये राजकीय क्षेत्र आक्रमक वक्तृत्वाने गाजवाल.

महत्वाचे वर्ष : ६, १५, २४, ३३, ४२, ५१, ६०, ६९.

भाग्यरत्न : हिरा याच तारेखेची व्यक्ती : पन्नालाल घोष , अझीम प्रेमजी, झहीर अब्बास, जेनिफर लोपेझ

# ऑलिम्पिक पदक विजेता स्वप्नील कुसाळेंचा मुख्यमंत्र्याकडून सत्कार



**मुंबई**–ऑलिम्पिक पदक जिंकून आल्यानंतर प्रथमच मराठमोळ्या स्वप्नील कुसाळे यांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सत्कार केला आहे. स्वप्नीलचे मार्गदर्शक व कुटुंबियांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे बक्षिसाच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत मागणी केली आहे.
मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानावर गणेशोत्सवानिमित्त स्वप्नील कुसाळेंने गणपतीचे दर्शन घेतले. याप्रसंगी मुख्यमंत्री शिंदे यांनी उपरणे परिधान करून स्वप्नील कुसाळेंला गौरवित केले. यावेळी खासदार श्रीकांत शिंदेही उपस्थित होते. त्यानंतर स्वप्नील व मार्गदर्शक अष्टपुत्रे यांच्यासोबत मुख्यमंत्री शिंदे यांनी अर्धा तास चर्चा केली. यावेळी तब्बल ७२ वर्षांनी महाराष्ट्रासाठी पदक जिंकल्याबद्दल राज्य शासनाच्या बक्षिसाच्या रक्कमेत वाढ करावी, पुढील ऑलिम्पिकच्या तयारीसाठी बालेवाडी स्टेडियमजवळ सदनिका मिळावी ही मागणी त्यांचे कुटुंबिय व मार्गदर्शक यांच्याकडून मुख्यमंत्र्यांना करण्यात आली.
पॅरीस ऑलिम्पिकमध्ये ५० मीटर थ्री पोझीशन नेमबाजीत कांस्यपदकाचा पराक्रम करणार्या स्वप्नील कुसाळे यांच्या बक्षिसाच्या रक्कमे वाढ करून त्यांना सर्व सुविधा देण्याबाबत शासन कटिबध्द असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले आहे. कल्याणमधील शूटिंग रेजच्या भेटीचे निमंत्रण खासदार श्रीकांत शिंदे यांनी स्वप्नील कुसाळेंला देत आवश्यक सुविधांसाठी शासन पाठबळ देईल असे आश्वासन देण्यात आले आहे.

# श्रीकृष्णनगर मित्र मंडळाला डॉ.सुजय विखे यांनी दिली सदिच्छा भेट..!

**नगर**–शिर्डीतील श्रीकृष्णनगर येथील रस्त्याचा आणि विजेचा प्रश्न अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याने तसेच रस्त्याच्या प्रश्र्नी शिर्डी नगरपरिषदेत वेळोवेळी निवेदने देऊनही काही नागरिक रस्त्याबाबत विरोध करत असल्याने मार्ग निघत नव्हता दरम्यान रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली चेंबरची झाकणे उघडी पडली. शालेय विद्यार्थी आणि दुचाकी धारकांचे अपघात देखील झाल्याने येथील नागरिक हतबल झाले होते. आणि अखेरचा पर्याय म्हणून श्रीकृष्णनगर मधील नागरिकांनी एकत्र येत थेट युवानेते डॉ सुजय विखे पा यांनाच गणपती निमित्त भेट देत यावर तोडगा काढण्याची विनंती केली असता डॉ सुजय विखे पाटील यांनी रस्ता छोटा असल्याने चक्क दुचाकी वर येत



येथील नागरिक,महिला यांच्याशी चर्चा केली आणि मुख्याधिकारी सतीश दिघे यांना तत्काळ बोलवून घेत संपूर्ण माहिती घेतली आणि रस्त्याबाबत सर्वांनी एकमत करा. मी तुम्हाला सिमेंट कॉंक्रिट चा नवा रस्ता तयार करून द्यायला लावतो असा शब्द दिल्याने श्रीकृष्ण नगर येथील नागरिकांनी डॉ सुजय विखे यांचे आभार मानले.
यावेळी सुजय विखेंच्या स्वागतासाठी रस्त्यावर संपूर्ण श्रीकृष्णनगर मधील महिला पुरुष चिमुकली मुले यांनी मोठी गर्दी करत त्यांचे औक्षण केले आणि तरुणाईमध्ये लोकप्रिय असलेल्या सुजय विखे यांचे आकर्षण चिमुकल्या मुलांना सुद्धा दिसून आले लहान लहान बालके मोबाईल घेऊन स्वतः फोटो काढण्याचा केविलवाणा प्रयत्न करतांना पाहून अनेकदा डॉ सुजय विखे यांना देखील हसू आवरले नाही अखेर सुजय विखे पाटलांनी गणपती समोर बसून घेत सर्वांसोबत एक फोटो काढला त्याचप्रमाणे महिला भगिनींच्या आग्रहास्तव जमिनीवर बसून महिलांच्या समवेत देखील फोटो सेशन केले यावेळी शिर्डीतील मान्यवर नेतेमंडळी, श्रीकृष्णनगर मधील महिला पुरुष तरुण आणि चिमुकल्या मुलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# गंजगोलाई बाजारपेठेतील रोडवर केलेले अतिक्रमण काढून नागरिकांना होणाऱ्या त्रासापासून मुक्त करावे

**लातूर**–लातूर येथील नावाजलेल्या महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेल्या विविधतेने नटलेल्या १६ रस्त्यांना जोडणारा प्रसिद्ध बाजारपेठ म्हणजे गंजगोलाई या सर्व विविध १६ रस्त्यांना जोडणारे रोड मेन रोड, कापड लाईन, भुसार लाईन, चुरमुरे मसाला लाईन, मस्जिद रोड, भाजी मार्केट, नांदेड रोड, नावंदर मार्ग, नवयुग टाकी मार्ग, शिवाजी महाराज मार्ग, सोनार लाईन, लोखंड लाईन मार्गावरील व्यापारी दुकानदाराने दुकाना व्यतिरिक्त समोर फुटपाथवर, रोडवर व्यापाऱ्यांनी टेबल व इतर साहित्य ठेऊन केलेल्या अतिक्रमणामुळे ग्राहकांना, महिला, नागरिकांना, पादचा–यांना, वाहन चालकांना रहदारी करतांना मोठी कसरत करावी लागत असून जाण्यासाठी मज्ञाव करीत अतिक्रमण करून अर्धा रोड चक्क दुकानदारीने बंद करून रहदारीस अडथळा निर्माण करीत आहेत यामुळे नागरिकांना अपघातांना सामोरे जावे लागत असल्याने आज शुक्रवार दिनांक १३ सप्टेंबर २०२४ रोजी लातूर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरेसह सी झोन क्षेत्रीय अधिकारी पवन सुरवसे यांना दुकानासमोरील रोडवर केलेल्या रस्त्यावर जाण्या येण्यासाठी अडथळा निर्माण होत असलेले अतिक्रमण तात्काळ काढावे व गंजगोलाईतील रस्त्यांनाही मोकळा श्वास द्यावा म्हणून जनहित युवा संघटनेने आज निवेदन देत आयुक्तांशी चर्चा केली.
याप्रसंगी जनहित युवा संघटनेने दिलेल्या निवेदनावर अतिक्रमण तात्काळ न हटवल्यास येणाऱ्या पुढील काळात लोकशाही पद्धतीने मोठे आंदोलन करणार असल्याचेही यावेळी आयुक्तांशी चर्चा करताना सांगितले. यावेळी जनहित युवा संघटना महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, जनहित युवा संघटना महाराष्ट्र राज्य मराठवाडा अध्यक्ष दीपक गंगणे, सामाजिक कार्यकर्ते हातिम भाई शेख,नितीन चालक आदींसह इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १० वर्षानंतर पाळणा हलला; बारशातून परतताना बाळासह कुटुंबावर काळाचा घाला!

**छ. संभाजीनगर**–छत्रपती संभाजीनगरमध्ये १० वर्षानंतर झालेल्या बाळाच्या बारशातून परतणाऱ्या कुटुंबावर काळाने घाला घातला. मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवणाऱ्या दोन तरुणांच्या स्कॉर्पिओने त्यांच्या कारला जोरदार धडक दिली. यात चार जणांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये आई, बाळ, आणि दोन लहान मुलांचा समावेश आहे, तर दोघे गंभीर जखमी झाले आहेत.
ही दुर्घटना वाळुज एम आयडीसी परिसरातील नगर रोडवर घडली. दारू पिऊन स्कॉर्पिओ चालवणाऱ्या विशाल चव्हाण (२२) आणि कृष्णा केरे (१९) यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्यांना अटक केली आहे. या घटनेने शहरात हळहळ व्यक्त होत आहे.
राज्यात हिट अँड रनच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून, हे अपघात गंभीर स्वरूपाचे ठरत आहेत. या प्रकरणाने मद्यधुंद वाहनचालकांवर कारवाई करण्याचे आवाहन नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# हिंदी भाषा रोजगाराभिमुख भाषा–डॉ.साईनाथ उमाटे

**लातूर**–हिंदी भाषा ही आपल्या मनातल्या सुख–दुःखाच्या भावभावना व विचार प्रकटीकरणाचे समाज व्यवहाराचे प्रभावी असे माध्यम आहे.हिंदी ही जन,मन आणि धनाची भाषा आहे.हिंदी भाषेत ज्ञानाचे प्रचंड असे भांडार आहे.हिंदी ही बॅंकिंग क्षेत्र,सिनेमासृष्टी,मीडिया क्षेत्र,जाहिरात क्षेत्र,भाषांतर,अनुवाद क्षेत्र,लेखन आणि स्पर्धा परीक्षा अशा अनेक क्षेत्रात रोजगार देणारी रोजगाराभिमुख भाषा आहे.ती विविधतेतून राष्ट्रीय एकात्मता व अखंडता साधण्याचे काम करते. अशा या हिंदी भाषेचा आदर व सन्मान सर्वांनी करावा,असे प्रतिपादन दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख डॉ.साईनाथ उमाटे यांनी केले.
येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने दि.१४ सप्टेंबर २०२४ रोजी 'हिंदी दिवस' साजरा करण्यात आला.यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे होते.याप्रसंगी हिंदी विभाग प्रमुख डॉ. गजानन बने,मराठी विभाग प्रमुख डॉ.रामशेट्टी शेटकार यांची प्रमुख उपस्थिती होती.
यावेळी डॉ.रामशेट्टी शेटकार असे म्हणाले की,मातृभाषा मराठी,राष्ट्रभाषा हिंदी आणि जागतिक भाषा इंग्रजी या तिन्ही भाषेचे मानवी जीवनात अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.या तिन्ही भाषेतून मनातल्या भावना अभिव्यक्त करता येतात.हिंदी ही विश्व स्तरावरची प्रभावी भाषा म्हणून प्रचंड उभारी देणारी रोजगाराभिमुख भाषा आहे.
प्रास्ताविक डॉ.गजानन बने यांनी केले तर आभार बुशरा शेख या विद्यार्थिनीने मानले. सूत्रसंचालन विशाल मस्के,वैभवी माने व तृप्ती बिराजदार यांनी




संयुक्तरित्या केले.प्रमुख पाहुण्याचा परिचय प्रज्वल जाजे यांनी करून दिला.याप्रसंगी सुनील राक्षे,हरिओम पाटोळे,राजेसाहेब पांचाळ यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# टाईमपास शब्दकोडे

**आडवे शब्द**
१. नमुना, मासला
३. वार्ताहर
७. चमकणारी बंगाली मिठाई?
१०. मिठी
१०अ. आस्था, प्रेम, माया
१२. मिठाला न जगणारा
१४. अंदाज करणे
१७. घाण
१८. 'आ'काराचे चिन्ह
१९. मांडणी, सजावट
२१. पायापासून डोक्यापर्यंत
२३. ज्वारी–बाजरीचा पदार्थ
२५. वर्तमानपत्रातीक कप्पा
२७. शूर
२९. काचेला पडलेली चीर
३०. उलटसुलट आगबोटच!
३२. सैन्याचा मालपुरवठा
३४. प्रामाणिख, सोज्वळ
३६. शत्रूच्या नाशाचे मंत्रतंत्र
३८. चामखीळ
४०. भरभराट
४१. डोंगरा किल्ला
४२. वाळा
४३. घटस्फोट
४४. मगज
४५. प्रार्थना
४६. मंत्रीमंडळ
४८. गंध उगाळण्याचे जोडसाधन
५०. आजूबाजूला
५०अ. तोरा, माज
५१. जाणीव
५२. अब्रूदार
५५. महात्मा गांधीजींचे नाव
५७. दृष्टीभेट
६१. सदोदित
६३. जुनीच्या विरुद्ध
६५. राखण करणारा
६७. चटकन, त्वरित
६८. सज्जनगडचे संत
७१. गंध
७२. अर्धांगवायू
७३. गव्हाचे पीठ
७४. मालाची विक्री
७६. सडक
७७. बाळभाषते देव
७८. कणीदार
७९. फळांचे पेय

**उभे शब्द**
१. डोंगा
२. अननुभवी
३. थापा
४. माशाची रास
५. किंमत
६. दागदागिने
७. ओरखडा
८. माझे
९. चार आठवडे
१०. पुष्परस
११. सापाची एक जात
१३. ही पिऊन लगेच गोरेपणा थोडाच मिळणार!
१५. कोंबड्याचे आवरणे
१६. कारणाशिवाय
१८. उसाच्या रसाचा घट्ट रांधा
२०. नाला, खंदक
२२. हेतू, कारण
२३. चारी ठाव जेवणातील दोन प्रमुख पदार्थ
२४. पादत्राण
२६. नासाडी, विध्वंस
२८. चांदी
३०. जून, निबर
३१. हिशोब
३३. क्षुल्लक किंमतीचे नाणे
३५. पदरी सैनिक बाळगणारा
३६. झोपेचे खोबरे!
३७. हिचे चोचले पुरवणे म्हणजे अनारोग्याला आमंत्रण
३९. एकमेकांसमोर
४३. सावरीचा असल्यास सगळ्यात मऊ
४४. तारणपत्र
४५. कमिशन, दलाली
४६. श्रीमंत
४६अ. लोखंड घसण्याचे हत्यार
४७. राख
४८. शिक्षा
४९. झोपडी
५३. दानशूर
५४. मातीचा कण
५६. पोते शिवण्याची सुई
५८. रात्री सुगंध पसरवणारी वनस्पती
५९. खाण्याची तंबाखू
६०. पातळसर
६१. पंजाबमधील एक नदी
६२. समशेर
६३. अपुऱ्या नाकाची
६५. अफूचे बीज
६६. खटला, हक्क (सांगणे)
६९. दहावी रास
७०. पुरावा असल्यास पुरेसा भक्कम
७३. खण पण कापड नव्हे
७५. पंख, दुसऱ्याचा



## मागील शब्दकोडे चे उत्तर

**आडवे उत्तर**
१.वानगी ३.बातमीदार ७.चमचम १०.कव १०अ.ममता १२.नमकहराम १४.आडाखा बांधणे १७.मळ १८.काना १९.रचना २१.आपादमस्तक २३.भाकरी २५.रकाना २७.वीर २९.तडा ३०.जहाज ३२.रसद ३४.सालस ३६.जारणमारण ३८.मस ४०.बरकत ४१.गड ४२.खस ४३.काडीमोड ४४.गर ४५.अर्चना ४६.सरकार ४८.सहाणखोड ५०.आसपास ५१.जाण ५२.पतदार ५५.मोहनदास ५७.नजरानजर ६१.सतत ६३.नवी ६४.राखणदार ६७.लवकर ६८.रामदास ७१.वास ७२.लकवा ७३.कणीक ७४.खप ७६.रस्ता ७७.बाप्पा ७८.रवाळ ७९.सरबत

**उभे उत्तर**
१.वाकडातिकडा २.नवखा ३.बाता ४.मीन ५.दाम ६.रकम पात ७.सारा ८.मग ९.महिना १०.मध ११.मणेर १३.हळद १५.बांग १६.विनाकारण १८.काकवी २०.चर २२.मतलब २३.भातपोळी २४.वहाण २६.नारा २८.रजत ३०.जरड ३१.जमाखर्च ३३.दमडी ३५.सरदार ३६.जागरण ३७.रसना ३९.समोरासमोर ४३.कापूस ४४.गहाणखत ४५.अडत ४६.सधन ४६अ.कानस ४७.रक्षा ४८.सजा ४९.खोपट ५३.दानवीर ५४.सरसरीत ६१.सतलज ६२.तलवार ६३.नकटी ६५.खसखस ६६.दावा ६९.मकर ७०.सबळ ७३.कप्पा ७५.पर

# जम्मू-काश्मीरच्या बारामुला येथे 3 दहशतवादी ठार!

**श्रीनगर**–जम्मू–काश्मीरच्या किश्तवाडमध्ये दहशतवाद्यांनी काल अचानक हल्ला केला होता. या हल्ल्यामध्ये भारतीय लष्कराचे दोन जवान शहीद झाले होते. या हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतीय लष्कराने अवघ्या २४ तासांच्या आत बारामुल्ला येथे शोधमोहिम राबवून ३ दहशतवाद्यांचा खात्मा केला. तसेच अजूनही काही दहशतवादी लपून बसले असून त्यांचा शोध घेतला जात आहे.
या परिसरात दोन ते तीन दहशतवादी लपून बसले आहेत. मारले गेलेले दहशतवादी आणि त्यांच्या गटाची ओळख पटवली जात आहे.
जम्मू–काश्मीरमधील तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात बारामुल्ला,



कुपवाडा आणि बांदीपोरा जिल्ह्यात १ ऑक्टोबरला मतदान होणार आहे.
दरम्यान, जम्मू विभागातील किश्तवाड जिल्ह्यातील चत्रू गावात अजूनही दहशतवादविरोधी कारवाई सुरू आहे, जिथे शुक्रवारी दहशतवाद्यांच्या एका गटाशी झालेल्या चकमकीत लष्कराचे २ जवान हुतात्मा झाले आणि २ जण जखमी झाले आहे. जम्मू विभागातील पुंछ, राजौरी, डोडा, कठुआ, रियासी आणि उधमपूर या डोंगराळ जिल्ह्यांमध्ये २ महिन्यांहून अधिक काळ लष्कर, सुरक्षा दल आणि नागरिकांवर दहशतवादी हल्ले होत आहेत.
दहशतवादी अचानक हल्ला करतात आणि नंतर डोंगराळ भागातील जंगलात गायब होतात या हल्ल्यांना परदेशी दहशतवाद्यांचा एक गट जबाबदार असल्याचे बोलले जात आहे. या दहशतवाद्यांची संख्या ४० ते ५० आहे. या अहवालानंतर, लष्कराने त्या जिल्ह्यांच्या घनदाट जंगलात ४ हजारांहून अधिक प्रशिक्षित सैनिक तैनात केले आहेत, ज्यात विशेष पॅरा कमांडो आणि पर्वतीय युद्धात प्रशिक्षित सैनिकांचा समावेश आहे.
राज्यात पहिल्या टप्प्यात १८ सप्टेंबर रोजी चिनाब खोऱ्यातील डोडा, किश्तवार आणि रामबन जिल्ह्यांतील आठ विधानसभा जागांसाठी तसेच दक्षिण काश्मीरमधील अनंतनाग, पुलवामा, शोपियान आणि कुलगाम जिल्ह्यांतील १६ जागांसाठी मतदान होणार आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यात जम्मू, कठुआ आणि सांबा जिल्ह्यात अनुक्रमे २५ सप्टेंबर आणि १ ऑक्टोबरला मतदान होणार आहे.

# ईद-ए-मिलाद सुट्टीच्या तारखेत बदल; सरकारचा मोठा निर्णय!



**मुंबई**–सोमवारी १६ सप्टेंबर रोजी मुस्लिम बांधवांचा 'ईद–ए–मिलाद' हा सण साजरा करण्यात येणार आहे. या दिवशी देशभरातील सर्व शैक्षणिक संस्थांसह सर्व सरकारी कार्यालये, न्यायालये, बँका आणि शाळांना सुट्टी असते. मात्र या सार्वजनिक सुट्टीबाबत सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे.
त्यामुळे १५ सप्टेंबर रोजी रविवार आणि १७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्थी अशा सलग तीन दिवस सुट्टी असल्यामुळे अनेकांनी बनवलेले हॉलिडेचे प्लॅनिंग काहीसे बिघडणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.
'ईद मिलाद उन– नबी' यासाठी राज्य सरकारने शासकीय सुट्टी जाहीर केली होती. मात्र १७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्थी असल्याने दोन्ही सणांमध्ये शांतता आणि सलोखा कायम राहावा, यासाठी मुंबई शहर आणि उपनगरासह इतर जिल्ह्यांमध्ये मुस्लिमधर्मियांनी जुलूस काढण्याचा निर्णय १८ सप्टेंबर रोजी घेतला आहे. त्यामुळे १६ सप्टेंबर रोजी देण्यात येणारी शासकीय सुट्टी रद्द करून १८ सप्टेंबर रोजी देण्यात येणार आहे. याबाबत सामान्य प्रशासन विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना पत्र काढून निर्णय घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
दरम्यान, नंदुरबार जिल्ह्यात हजरत मोहम्मद पैगंबर यांची जयंती निमित्त सामाजिक सलोखा कायम ठेवण्यासाठी मुस्लीम समाज बांधवांनी १६ ऐवजी १९ सप्टेंबर रोजी मिरवणूक काढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रशासन आणि पोलीस यंत्रणांवरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

# लाहोटी स्कूलमध्ये गणेशोत्सव उत्साहात साजरा



**लातूर**–राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये शनिवारी स्कूलच्या प्रांगणात गणेशोत्सव विविध उपक्रमांचे आयोजन करून उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.
प्रारंभी विद्यार्थ्यांनी स्कूलच्या प्रांगणातून गणरायाची ढोल ताशाच्या गजरात भव्य मिरवणूक काढली. मिरवणुकीमध्ये शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नववी व दहावी वर्गाच्या विद्यार्थ्यांनी वर्गाच्या विद्यार्थ्यांनी 'जय जय गणेशा ' या गाण्यावर बहारदार नृत्य सादर केले व नृत्य सादरी करणानंतर श्री गणेशाची आरती करून पूजन करण्यात आले. 'गणपती बाप्पा मोरया...' च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरण निर्माण झाले.
याप्रसंगी प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलु, मनोहर कबाडे, अरुल शेल्वी, रेश्मा चव्हाण आदींची उपस्थिती होती. गणेश उत्सवानिमित निमित स्कूल मध्ये विविध उपक्रम घेण्यात आले. यामध्ये भव्य रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. कला विभागाच्यावतीने पर्यावरणपूरक गणपती बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली, यामध्ये विद्यार्थ्यांनी मातीपासून सुंदर गणपतीच्या मूर्ती तयार केल्या. विद्यार्थ्यांनी बनवलेल्या सुंदर मूर्तींचे प्रदर्शन स्कूल मध्ये भरवण्यात आले होते.

### ऐन गणेशोत्सवात पुण्यात पुन्हा गोळीबार

**पुणे**–पुण्यात उरुळी कांचनम धल्या इनामदार वस्तीवर गोळीबाराची घटना घडलीय. यात एक जण जखमी झाला असल्याची माहिती समोर आलीय. काळूराम गोते असं जखमी झालेल्या व्यक्तीचं नाव आहे. त्यांच्यावर तीन गोळ्या झाडण्यात आल्या आहेत.
काळूराम यांना पुण्याला हलवण्यात आले आहे.
पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास करत आहेत.
याबाबत मिळालेली माहिती अशी की, उरुळी कांचन इथे इनामदार वस्तीवर राहणाऱ्या दशरथ शितोळे यांच्या घरी काळूराम गोते गेले होते.
तेव्हा दशरथ शितोळे आणि काळूराम गोते यांच्यात रिंगरोड जमिनीच्या पैशाच्या व्यवहारावरून वाद झाला. या वादातूनच संतापलेल्या दशरथ शितोळे यांनी काळूराम गोते यांच्यावर गोळीबार केला. तीन गोळ्या झाडण्यात आल्या.

## सणवाराच्या काळात चुकीच्या पोस्ट टाकणाऱ्यांवर पोलीस कारवाई



**नांदेड**–सण–उत्सवाच्या काळात माध्यमांचा गैरवापर करणाऱ्यांवर, अफवा पसरवणाऱ्यांवर सायबर सेलने लक्ष देण्याचे निर्देश जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिले आहेत. गणेश उत्सव आणि ईद– ए –मिलाद हे दोन्ही सण यावर्षी एकाच कालावधीत आले आहेत. जिल्ह्यात हे दोन्ही सण साजरे करतांना सर्व धर्मीयांनी परस्पर सौहार्द व शांततेला गालबोट लागणार नाही याची काळजी घेऊन एकोप्याने व आनंदाने सण साजरे करावेत, असे आवाहन त्यांनी केले आहे. या काळात सर्व धर्मियांकडून विविध सांस्कृतिक कार्यक्रम, देखावे, वेगवेगळ्या प्रतिकृती, वेगवेगळ्या सणांच्या मिरवणूक नांदेड शहर व नांदेड ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्या संदर्भातील प्रसिद्धी, व्हिडीओ देताना अतिशय गांभीर्याने वृत्तांकन होईल, याबाबतची विनंती सर्व माध्यम प्रतिनिधींना करण्यात आली आहे.
काही अनधिकृतरीत्या वेब पोर्टल चालविणारे सामाजिक जाणीवांचे भान ठेवत नाही, अशांवर सक्त कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

## नीरज चोप्राच्या निशाण्यावर आज '९०पारचे' लक्ष्य




**मुंबई**–डायमंड लीग फायनलमध्ये भारताला वर्ल्ड चॅम्पियन आणि पॅरिस ऑलिम्पिकमधील कांस्यपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्राकडून अपेक्षा असतील. शनिवारी रात्री उशिरा त्याचा सामना रंगणार आहे. नीरजचे यावेळी ९० पार भाला फेकण्याचे लक्ष्य असेल.
नीरज चोप्राचा सर्वोत्कृष्ट थ्रो ८९.९४ मीटरचा आहे. हा थ्रो त्याने ३० जून २०२२ला स्वीडनमध्ये स्टॉकहोम डायमंड लीगमध्ये केला होता. यापेक्षा जास्त लांब थ्रो नीरज चोप्राला अद्याप करता आलेला नाही. अशातच नीरचचे लक्ष्य ९०पार असेल.
नॅशनल रेकॉर्ड होल्डर अविनाश साबळेने डायमंड लीग फायनलमध्ये कमी वेळेसह नववे स्थान मिळवले. ब्रुसेल्समध्ये ३००० मीटर स्टीपलचेजमध्ये शुक्रवारी ३० वर्षीय साबळेने डेब्यू डायमंड लीग फायनलमध्ये १० खेळाडूंमध्ये ८ मिनिटे आणि १७.०९ सेकंदाचा वेळ घेत नववे स्थान मिळवले.

# स्पर्धेच्या युगात वावरत असताना सर्व प्रथम जन्मदात्या आई-वडिलांची सेवा करा

**शिरूर अनंतपाळ**–शिरूर अनंतपाळ तालुक्यातील डिगोळ येथे गणेशोत्सवानिमित्त जय भवानी जय शिवाजी गणेश मंडळ डिगोळ यांच्या वतीने जगप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन मा.श्री. विठ्ठल लहाने यांचे व्याख्यान विद्यार्थी, शिक्षक, पालक व गावातील सर्व ग्रामस्थ यासाठी ठेवण्यात आले होते. त्यावेळी डॉ. विठ्ठल लहाने जनतेशी संवाद साधत असताना बोलत होते की आपण निवडलेल्या भविष्य उज्वल करण्याच्या वाटचालीवर माणसाने मेहनत घेतल्यास त्यात यश नक्कीच मिळते. व त्यासाठी योग्य मार्गदर्शन, मेहणती मधील सातत्य , आत्मविश्वास, वचनबद्धता हे यशाचे पासवर्ड आहेत. त्या बरोबरच मुलांवर चांगल्या गोष्टी बिंबविल्या पाहिजेत असे प्रतिपादन प्रसिद्ध सर्जन डॉ. विठ्ठल लहाने यांनी केले. तर व्याख्यान कार्यक्रमाचा श्रीगणेशा छ. शिवाजी महाराजांच्या मूर्तीला पुष्प अर्पण व अभिवादन करून करण्यात आला. यावेळी या



कार्यक्रमास डिगोळ पंचक्रोशीतील जनतेचा उतस्पूर्तपणे प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमास प्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ.विठ्ठल लहाने, उद्योजक उदय देशपांडे, बाबुराव बोरोळे,वैजनाथ बावगे, सिध्देश्वर कोटे, रामदास एकुर्के, इत्यादी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनिल दासरे, उध्दव जाजुर्णे, रमाकांत बिरादार, राम बिरादार, अण्णासाहेब पाटील, महेश पाटील, धनराज चावरे,महादेव कोटे, नागनाथ कोटे, चंद्रशेखर बावगे, बस्वराज बावगे,सुशिल बिरादार, दिनकर टाकळगावे,आर्जुन पाटील,जनक बिरादार, खंडेराव बोयणे, शुभम पाटील, आशिष बिरादार, शिवहार कोटे, गणेश चावरे,अनिकेत बोरोळे, राहुल गांदगे, अक्षय स्वामी, विठ्ठल जाजुर्णे इ. जणांनी मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाजपचे युवा नेते रामेश्वर धनराज चावरे यांनी केले.तर आभार प्रदर्शन रामदास एकुर्के यांनी केले.

# भाजप, काँग्रेसमध्ये आंदोलन 'वॉर'; राहुल गांधी यांच्या विधानाविरोधात आणि समर्थनार्थ दोन्ही पक्ष मैदानात

**मुंबई**–देशातील आरक्षण संपवण्याबाबत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अमेरिकेत केलेल्या वक्तव्यावरून भाजप आक्रमक झाली असून शुक्रवारी मुंबईसह राज्यभरात आंदोलन केले. भाजप नेत्या पंकजा मुंडे आणि आशीष शेलार यांनी घाटकोपर येथे आंदोलन करत राहुल गांधींनी चैत्यभूमीवर जाऊन नाक घासून माफी मागावी, अन्यथा आंदोलन सुरूच राहिल, असा इशारा पंकजा मुंडे यांनी दिला. तर राहुल गांधी आरक्षणाविरोधात हा भाजपचा अपप्रचार असा घणाघात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला.
काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारतातील आरक्षण संपवण्याबाबत वक्तव्य केल्यानंतर शुक्रवारी राज्यभर भाजपकडून आंदोलन करण्यात आले. मुंबई, पुणे, नाशिक, सोलापूर, नागपूर यासह संपूर्ण महाराष्ट्रात भाजप नेते आक्रमक झाले आहेत. यावेळी राहुल गांधी यांच्याविरोधात ठिकठिकाणी घोषणाबाजी करण्यात आली. मुंबईत घाटकोपर परिसरात भाजप नेत्या पंकजा मुंडे आणि मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले. घाटकोपर रमाबाई आंबेडकर नगर येथे पंकजा मुंडे आणि आशीष शेलार आंदोलनात सहभागी झाले होते. राहुल गांधींनी केलेल्या वक्तव्याचा जोरदार निषेध करण्यात आला. राहुल गांधींचा धिक्कार आणि निषेध करतो. राहुल गांधी हे जोपर्यंत माफी मागत नाहीत, तोवर आमचे आंदोलन सुरू राहील. त्यांनी आपल्या संविधनाचा अपमान केला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा पडला, तेव्हा मोदींनी माफी मागितली. यावर मनोज जरांगे काय बोलतात, त्यासाठी मी उत्सुक आहे, असे पंकजा मुंडे म्हणाल्या. धुळ्यातही राहुल गांधी यांनी केलेल्या वक्तव्याचा निषेध करण्यात आला. यावेळी राहुल गांधी यांच्या प्रतिमेला चप्पल मारो आंदोलन करण्यात आले. तर सोलापुरात भाजप कार्यकर्ते आक्रमक झाले होते. भाजप पदाधिकाऱ्यांकडून बॅनरबाजी करत राहुल गांधींचा निषेध व्यक्त करण्यात आला.
काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या वक्तव्याचा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील रिपब्लिकन पक्षातर्फे मुंबईत आझाद मैदान येथे निषेध करण्यात आला. रिपब्लिकन पक्षाने मुंबईत आझाद मैदान आणि राज्यभर अनेक ठिकाणी राहुल गांधी यांच्या प्रतिमेला चप्पल मारून तीव्र निषेध आंदोलन केले.आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवून सर्व समाज घटकाला आरक्षणाचा लाभ मिळावा, अशी भूमिका विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी घेतलेली आहे. भाजप सरकारने सरकारी संस्था विकून नोकऱ्या संपवल्या. संवैधानिक संस्था संपवण्याचे काम केल्याचा भाजपाचा भांडाफोड केला आहे, म्हणून राहुल गांधी यांच्याविरोधात भाजप खोटा प्रचार करत आहे, असे पटोले म्हणाले.

# कोकणातील गणेशभक्तांचा सोयीस्कर, सुखकर प्रवास

**पेण**–सहा दिवसांच्या गणपती व गौरी विसर्जनानंतर मुंबई–गोवा महामार्गावरून कोकणातील चाकरमान्यांना मुंबईला घेऊन निघालेल्या एसटी बस, कार, रिक्षा, इको, मोटारसायकल, छोट्या–मोठ्या बसेस व विविध प्रकारच्या वाहनांची अत्यंत वेगवान वर्दळ दिसून आली आहे. परंतु रायगड जिल्हा पोलिसांच्या वाहतुकीच्या नियोजनपूर्ण व्यवस्थेमुळे यावर्षी तुरळक ठिकाणे सोडता कुठेही तासनतास अडकणाऱ्या ट्रॅफिकचा सामना भक्तांना करावा लागला नाही.

## फहिमुनिसा बागमरू यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**लातूर**–डॉ. जाकिर हुसैन विद्यालयाच्या शिक्षिका सौ. फहिमुनिसा मोहम्मद आब्बास बागमरू यांना राज्य उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. नुकत्याच झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये खा. डॉ. शिवाजी काळगे व छत्रपती संभाजीनगर विभागाचे शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते सौ. फहिमुनीसा बागमारू यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी राज्य उर्दू शिक्षक संघटनेचे लातूर जिल्हा अध्यक्ष नुसरत कादरी, संघटनेचे एम. ए. गफार यांची उपस्थिती होती.
सौ. फहिमुनीसा बागमारू यांना मिळालेल्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराबद्दल जे. टी. एस. बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष जे.टी. शेख, सचिव ड. यास्मिन शेख, मालिक शेख, जास्मिन शेख, हासरत शेख, मुस्कान शेख, फिरोज सय्यद, मतीन शेख, मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

